सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र शासन

# उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## पूर्णवेळ तांत्रिक पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता माहिती पुस्तिका

शैक्षणिक वर्ष - 2023-2024



(प्रथम वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रम आणि
प्रथम वर्ष पोस्ट एचएससी पदविका औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय
व्यवस्था तंत्रज्ञान, सरफेस कोटींग तंत्रज्ञान अभ्यासक्रम आणि
थेट द्वितीय वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रम)

तंत्र शिक्षण संचालनालय,मुंबई
महाराष्ट्र राज्य

# महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



## श्री. एकनाथ शिंदे
माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



## श्री. देवेंद्र फडणवीस
माननीय उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



## श्री. चंद्रकांत पाटील
मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण
महाराष्ट्र राज्य



### श्री. विकास चंद्र रस्तोगी
प्रधान सचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग



### डॉ. विनोद मोहितकर
प्र. संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय

**तंत्र शिक्षण संचालनालय,मुंबई**
**महाराष्ट्र राज्य**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## माहिती पुस्तिका

# पूर्णवेळ तांत्रिक पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता

(प्रथम वर्ष पोस्ट एसएससी पदविका अभियांत्रिकी व

तंत्रज्ञान अभ्यासक्रम

आणि

प्रथम वर्ष पोस्ट एचएससी पदविका औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व

खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान, सरफेस कोटींग तंत्रज्ञान अभ्यासक्रम

आणि

थेट द्वितीय वर्ष पोस्ट एसएससी पदविका

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रम)

शैक्षणिक वर्ष

**२०२३-२४**

## तंत्र शिक्षण संचालनालय

महाराष्ट्र राज्य, मुंबई

३, महापालिका मार्ग, पोस्ट बॉक्स नंबर १९६७, मेट्रो सिनेमागृहासमोर, मुंबई-४०० ००१

ई-मेल: desk10@dtemaharashtra.gov.in

वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

## तंत्रशिक्षण संचालनालयाची विभागीय कार्यालये

| अ. क्र | विभागीय कार्यालयाचे नाव व पत्ता | संपर्क क्रमांक आणि ईमेल | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | **अमरावती विभाग**<br>सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, न्यू कॉटन मार्केट रोड, सहकारनगर, अमरावती-४४४६०३ | दूरध्वनी: ०७२१-२५७३०२७<br>फॅक्स: ०७२१-२५७७९१३<br>ईमेल: roamravati@dtemaharashtra.gov.in<br>वेबसाईट: http://www.jdroamt.org | १. अमरावती<br>२. अकोला<br>३. बुलढाणा<br>४. यवतमाळ<br>५. वाशिम |
| २ | **औरंगाबाद विभाग**<br>सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, स्टेशन रोड, उस्मानपुरा, शासकीय तंत्रनिकेतन परिसर जवळ, पी.ओ. बॉक्स क्र.११९, औरंगाबाद- ४३१००५ | दूरध्वनी: ०२४०-२३३४२१६(P),२३३४७६९(O)<br>फॅक्स: ०२४०-२३५६८२०<br>ईमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in<br>वेबसाईट: http://www.dteau.org | १. औरंगाबाद<br>२. बीड<br>३. जालना<br>४. लातूर<br>५. हिंगोली<br>६. नांदेड<br>७. परभणी<br>८. उस्मानाबाद |
| ३ | **मुंबई विभाग**<br>सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, जागतिक बँक प्रकल्प इमारत, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, ४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ | दूरध्वनी: ०२२-६९१६२३००<br>फॅक्स: ०२२-२६४७४८९२,२६४७१६१९<br>ईमेल: romumbai@dtemaharashtra.gov.in<br>वेबसाईट:http://www.jdteromumbai.com | १. मुंबई<br>२. मुंबई उपनगर<br>३. ठाणे<br>४. रायगड<br>५. रत्नागिरी<br>६. सिंधुदुर्ग<br>७. पालघर |
| ४ | **नागपूर विभाग**<br>सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर बाजार, नागपूर-४४०००१ | दूरध्वनी: ०७१२-२५६५१४३,२५४९३८७<br>फॅक्स: ०७१२-२५६१६६३<br>ईमेल: ronagpur@dtemaharashtra.gov.in<br>वेबसाईट: http://www.rdtenagpur.org.in | १. भंडारा<br>२. चंद्रपूर<br>३. गोंधिया<br>४. गडचिरोली<br>५. नागपूर<br>६. वर्धा |
| ५ | **नाशिक विभाग**<br>सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नवीन तंत्रनिकेतन परिसर पोस्ट बॉक्स क्रमांक २१७, सामनगाव रोड, नाशिक रोड, नाशिक - ४२२१०१ | दूरध्वनी: ०२५३-२४६१४७९,२४६०११४ (P)<br>फॅक्स: ०२५३-२४५५३०१<br>ईमेल: ronashik@dtemaharashtra.gov.in<br>वेबसाईट: http://www.dtensk.org | १.अहमदनगर<br>२.जळगाव<br>३.धुळे<br>४.नाशिक<br>५.नंदुरबार |
| 6 | **पुणे विभाग**<br>सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२- ई, शिवाजी नगर, बहिरट पाटील चौक, पुणे-४११०१६ | दूरध्वनी: ०२०-२५६५६२३४,२५६७८९७३<br>फॅक्स: ०२०-२५६५६२३४<br>ईमेल: ropune@dtemaharashtra.gov.in<br>वेबसाईट: http://www.ropune.org.in | १. पुणे<br>२. कोल्हापूर<br>३. सातारा<br>४. सांगली<br>५. सोलापूर |

## अनुक्रमणिका


| नियम क्रमांक | शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त नाव व प्रारंभ | ६ |
| १ अ | माहितीपत्रकात वापरलेली संक्षिप्त नामे | ६ |
| २ | व्याख्या | ७ |
| ३ | सक्षम प्राधिकारीची भूमिका आणि जबाबदारी | १० |
| ४ | पात्रतेचे निकष | ११ |
| ५ | उमेदवारीचे प्रकार | १५ |
| ६ | विविध पाठयक्रमांकरिता मंजूर प्रवेशक्षमता, आरक्षण व अधिसंख्य जागा | १८ |
| ७ | जागावाटप | १९ |
| ८ | गुणवत्ता यादी तयार करणे | २१ |
| ९ | केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) | २२ |
| १० | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) वाटपाचे टप्पे आणि पद्धती | ३० |
| ११ | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅपच्या) पहिल्या व दुसऱ्या फेरीव्दारे जागाचे वाटप करणे | ३३ |
| १२ | सर्वसाधारण सूचना | ३४ |
| १३ | संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागावर प्रवेश | ३६ |
| १४ | गुणवत्ता यादी व प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीस मान्यता | ३७ |
| १५ | प्रवेश रद्द करणे व शुल्काचा परतावा ,संस्थेद्वारे कागदपत्र परत देणे | ३७ |
| १६ | पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षानंतर पाठयक्रम किंवा संस्था बदलणे | ३८ |
| १७ | शुल्क आणि सवलती | ३९ |
| १८ | विविध तरतुदी | ४१ |
| अनुसूची - एक | एसएससी नंतरच्या पदविका पाठ्यक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाकरिता | ४५ |
| | पदविका अभ्यासक्रमासाठी शासकीय, अशासकीय अनुदानित तांत्रिक पदविका संस्थांतील जागांचे वाटप | ४५ |
| | पदविका अभ्यासक्रमासाठी विनाअनुदानित खाजगी तांत्रिक पदविका संस्थांतील जागांचे वाटप | ४६ |
| | अधिसंख्य जागांचे वाटप | ४७ |
| अनुसूची - दोन | एचएससी नंतरच्या पदविका पाठ्यक्रमाच्या प्रवेशाकरिता | ५३ |
| | पदविका अभ्यासक्रमासाठी शासकीय , अशासकीय अनुदानित तांत्रिक पदविका संस्थांतील जागांचे वाटप | ५३ |
| | पदविका अभ्यासक्रमासाठी विनाअनुदानित खाजगी तांत्रिक पदविका संस्थांतील जागांचे वाटप | ५३ |
| | अधिसंख्य जागांचे वाटप | ५४ |

| नियम क्रमांक | शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| अनुसुची - तीन | एस एस सी नंतरच्या थेट द्वितीय वर्ष पदविका पाठ्यक्रमाच्या प्रवेशाकरिता | ५९ |
| | पदविका अभ्यासक्रमासाठी शासकीय , अशासकीय अनुदानित तांत्रिक पदविका संस्थांतील जागांचे वाटप | ५९ |
| | पदविका अभ्यासक्रमासाठी विनाअनुदानित खाजगी तांत्रिक पदविका संस्थांतील जागांचे वाटप | ६० |
| | एस एस सी नंतरच्या थेट द्वितीय वर्ष पदविका पाठ्यक्रमाच्या प्रवेशाकरिता पात्रतेसाठी आवश्यक अर्हतेनुसार विभागणी | ६० |
| अनुसुची - चार | आरक्षण | ६१ |
| | १.१ सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास उमेदवारांसाठीचे आरक्षण | ६१ |
| | १.२ दिव्यांगाकरिता आरक्षण | ६२ |
| | १.३ अनाथ उमेदवारांसाठी आरक्षण | ६२ |
| | १.४ संरक्षण सेवेतील कर्मचाऱ्यांच्या मुला/ मुलीं करिता आरक्षण | ६३ |
| | १.५ महिला उमेदवारांसाठी आरक्षण | ६३ |
| | १.६ आर्थिकदृष्टया दुर्बल प्रवर्गातील उमेदवारांसाठी आरक्षण | ६३ |
| | १.७ धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी द्वितीय पाळीमधील अभ्यासक्रम असलेल्या शासकीय संस्थांमध्ये आरक्षण: - (दहावीनंतरच्या प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रम व थेट द्वितीय वर्ष अभ्यासक्रम) | ६४ |
| | १.८ मागासवर्गीय उमेदवारांकरिता आरक्षण आणि शुल्क माफी योजनेसाठी आवश्यक प्रमाणपत्रांची यादी | ६४ |
| अनुसुची - पाच | विद्यार्थ्यांना विद्यमान संस्थेमधून दुसऱ्या कोणत्याही संस्थेमध्ये बदलून जाण्याची तरतूद | ६६ |
| परिशिष्ट-I | मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी आणि जैन समाजातील धार्मिक अल्पसंख्यांक उमेदवारांसाठी ७०% जागा राखीव असलेल्या तुकडीत सुरु असलेल्या शासकीय संस्थांची यादी | ६७ |
| परिशिष्ट-II | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अर्जाचा फॉर्म सोबत ऑनलाइन अपलोड करण्याची/जोडण्याची कागदपत्रे | ६८ |
| | दहावीनंतरचे प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रम | ६८ |
| | बारावीनंतरचे प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रम | ७१ |
| | थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रम | ७४ |
| परिशिष्ट-III | थेट द्वितीय वर्ष पोस्ट एसएससी पदविका प्रवेशासाठी पात्रता गट व संबंधित पदविका अभ्यासक्रमांचा समूह व उपसमूह | ७६ |
| परिशिष्ट-IIIA | थेट द्वितीय वर्ष पोस्ट एसएससी पदविका प्रवेशासाठी तांत्रिक व्यावसायिक विषयांची यादी (टेक्निकल व्होकेशनल सब्जेक्ट) | ७७ |
| परिशिष्ट IV | दहावीनंतरचे प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी (कॅप) राज्यस्तरीय गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येणाऱ्या विशिष्ट अभ्यासक्रमांची यादी | ८२ |
| परिशिष्ट V | तंत्रशिक्षण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजना | ८३ |
| प्रोफोर्मा - A | टाइप-सी उमेदवारांसाठी: केंद्र सरकार/भारत सरकारचे उपक्रम असलेल्या | ८६ |

| नियम क्रमांक | शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मुलां/मुलींसाठी | |
| प्रोफोर्मा B - 1 | टाइप- डी उमेदवारांसाठी: महाराष्ट्र शासनाचे/महाराष्ट्र शासनाचे उपक्रम असलेल्या ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मुलां/मुलींसाठी | ८७ |
| प्रोफोर्मा B - 2 | टाइप- डी उमेदवारांसाठी: महाराष्ट्र शासनाचे/महाराष्ट्र शासनाचे उपक्रम असलेल्या ठिकाणाहून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या मुलां/मुलींसाठी | ८७ |
| प्रोफोर्मा C | डीइएफ-१ डीइएफ-२, डीइएफ-३ उमेदवारांसाठी: संरक्षण कर्मचाऱ्यांच्या मुलां/मुलींसाठी | ८८ |
| प्रोफोर्मा D | डीइएफ-३ उमेदवारांसाठी: सक्रिय संरक्षण सैनिक नॉन डोमिसाईल महाराष्ट्र (डीइएफ-३) कर्मचाऱ्यांच्या मुलां/मुलींसाठी | ८९ |
| प्रोफोर्मा E | डीइएफ-३ उमेदवारांसाठी: सक्रिय संरक्षण सैनिक नॉन डोमिसाईल महाराष्ट्र परंतु कुटुंब महाराष्ट्रात वास्तव्य करीत आहे. | ८९ |
| प्रोफोर्मा F/F1/F2/F3/F4 | दिव्यांग प्रवर्गातील उमेदवार | ९० |
| प्रोफोर्मा G1/G2 | महाराष्ट्र कर्नाटक सीमा क्षेत्र उमेदवार | ९७ |
| प्रोफोर्मा J | लष्करी व निमलष्करी दलातील कर्मचारी/भारतीय प्रशासकीय सेवा (भाप्रसे)/ भारतीय पोलीस सेवा (भापोसे)/ भारतीय विदेश सेवा (भाविसे)/ जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र पोलिस यामधील अधिकारी जे अतिरेकी कारवायांचा बिमोड करण्यासाठी जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मध्ये नियुक्त आहेत अशांच्या मुलां/मुलींसाठी | ९८ |
| प्रोफोर्मा K | जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र स्थलांतरित उमेदवार- निर्वासित छावणीत राहणाऱ्यांसाठी | ९८ |
| प्रोफोर्मा L | जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र स्थलांतरित उमेदवार- स्थलांतरित / निर्वासित छावणी व्यतिरिक्त इतर ठिकाणी नातेवाईक / मित्रांसह भारतात राहणाऱ्या उमेदवारांसाठी | ९९ |
| प्रोफोर्मा M | काश्मीर खोऱ्यांमध्ये राहत असलेल्या काश्मिरी पंडित/काश्मिरी हिंदू कुटुंबे (निवासी) आणि ज्यांच्याकडे अधिवास प्रमाणपत्र आहे अशा उमेदवारांसाठी | ९९ |
| प्रोफोर्मा N | ज्या उमेदवाराने इतर कोणत्याही संस्थेत प्रवेश मिळविला आहे त्या उमेदवाराने, त्या संस्थेत त्याचे याआधीचा शाळा/महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याचे मूळ प्रमाणपत्र जमा केले आहे हे दर्शविणारा | १०० |
| प्रोफोर्मा O | अल्पसंख्याक समुदायातील असल्याबाबतचे स्व-घोषणापत्र | १०१ |
| प्रोफोर्मा T | विद्यार्थी स्थलांतरणासाठी : मूळ संस्थेकडील ना हरकत प्रमाणपत्र, प्रवेश देणार्‍या संस्थांकडून ना हरकत प्रमाणपत्र | १०३ |
| प्रोफोर्मा U | अनाथ उमेदवारांसाठी राखीव असलेल्या जागांवर दावा करणाऱ्यांसाठी | १०५ |
| प्रोफोर्मा V | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी राखीव असलेल्या जागांवर दावा करणाऱ्यांसाठी | १०६ |


****

## महाराष्ट्र राज्य तांत्रिक पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक संस्था
## प्रवेश माहिती पुस्तिका, २०२३

महाराष्ट्र शासनाने, राज्यामध्ये विविध पूर्णवेळ तांत्रिक पदविका पाठयक्रमांच्या प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्षांना प्रवेश घेण्यासाठी लागणारी प्रवेश पात्रता व प्रवेशासाठीचे नियम “महाराष्ट्र राज्य तांत्रिक पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक संस्था (प्रवेश) नियम, २०१९” या नावाने १७ मे, २०१९ रोजी प्रकाशित केले असुन २२ जुलै २०२०, १८ जुन २०२१, ०१ जुन २०२२ व ३० मे, २०२३ रोजी त्यामध्ये दुरुस्ती करण्यात आलेली आहे. या नियमांमध्ये आणि दुरुस्तीमध्ये प्रवेशासाठी आवेदनपत्र मागविणे, प्रवेश पात्रता, गुणवत्ता यादी तयार करणे, जागावाटप, संस्थास्तरीय कोटयातील जागा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवरप्रवेश, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) वाटपाचे टप्पे आणि पद्धती, अधिसंख्य जागा, गुणवत्ता यादी व प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीस मान्यता, प्रवेश रद्द करणे, गुणवत्ता यादी व प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीस मान्यता, शुल्काचा परतावा इत्यादी बाबींच्या कार्यपद्धतीचा समावेश आहे.

हे नियम आणि दुरुस्ती महाराष्ट्र राज्यातील पूर्णवेळ प्रथमवर्ष व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान तांत्रिक पदविका पाठयक्रम राबविणाऱ्या आणि प्रथमवर्ष औषधनिर्माणशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पदविका पाठयक्रम राबविणाऱ्या महाराष्ट्र राज्यामधील खालील नमूद विविध संस्थाना लागू होतील.

(क) सर्व शासकीय स्वायत्त व बिगर स्वायत्त तंत्रनिकेतने/संस्था

(ख) सर्व अशासकीय अनुदानित स्वायत्त व बिगर स्वायत्त तंत्रनिकेतने/संस्था (अल्पसंख्यांकासाठीच्या संस्था धरून)

(ग) सर्व विद्यापीठ संचालित तंत्रनिकेतने/संस्था

(घ) सर्व खाजगी विनाअनुदानित तंत्रनिकेतने/संस्था (अल्पसंख्यांकासाठीच्या संस्था धरून)

### १. संक्षिप्त नाव व प्रारंभ, -

(१) या नियमांना, महाराष्ट्र राज्य तांत्रिक शैक्षणिक संस्था (प्रवेश ) नियम,२०१९ असे म्हणावे. या नियमांमध्ये २२ जुलै २०२०, १८ जुन २०२१, १ जुन २०२२ व ३० मे, २०२३ रोजी त्यामध्ये दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

(२) ते शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अंमलात येतील.

### १-अ. माहितीपत्रकात वापरलेली संक्षिप्त नामे

| | | |
|---|---|---|
| एआयसीटीई | ऑल इंडिया कॉऊंसिल फॉर टेक्निकल एज्युकेशन | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद |
| कॅप | सेंट्रलाइज्ड ऍडमिशन प्रोसेस | केंद्रीभुत प्रवेश प्रक्रिया |
| सीबीएसई | सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन | केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ |
| सीजीपीए | क्युम्युलेटिव्ह ग्रेड पॉईंट ॲव्हेरज | संचयी ग्रेड पॉइंट सरासरी |
| डीटीई | डायरोक्टोरेट ऑफ टेक्निकल एज्युकेशन, महाराष्ट्र स्टेट | तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य |

| | | |
|---|---|---|
| ईडब्ल्यूएस | इकॉनॉमीकली विकर सेक्शन | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक |
| जिओआई | गव्हर्नमेंट ऑफ इंडिया | भारत सरकार |
| जिओएम | गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र | महाराष्ट्र शासन |
| एचडी | होम डिस्ट्रिक्ट | मूळ जिल्हा |
| एचएससी | हायर सेकंडरी सर्टिफिकेट | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र |
| आयसीएसई | इंडियन सर्टिफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशन | भारतीय माध्यमिक शिक्षण प्रमाणपत्र |
| एमएसबीटीई | महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ |
| एमएसबीएस एचएसई | महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ सेकंडरी अँड हायर सेकंडरी एज्युकेशन | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ |
| एमएसबीव्हीई | महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ व्होकेशनल एज्युकेशन | महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण मंडळ |
| एमएसबीएसडी | महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ स्किल डेव्हलपमेंट | महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ |
| एनआरआय | नॉन रेसिडेंट इंडियन | अनिवासी भारतीय |
| ओएचडी | आऊटसाईड होम डिस्ट्रिक्ट | मूळ जिल्ह्याबाहेरील |
| ओएमएस | आऊटसाईड महाराष्ट्र स्टेट | महाराष्ट्र राज्याबाहेरील |
| पीआयओ | पर्सन ऑफ इंडियन ओरिजिन | भारतीय वंशाची व्यक्ती |
| एसएससी | सेकंडरी स्कुल सर्टिफिकेट | माध्यमिक शालेय प्रमाणपत्र |
| एचएससी | हायर सेकंडरी सर्टिफिकेट | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र |
| पीसीआय | फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया | भारतीय भेषजी परिषद |
| डीव्हीईटी | डायरोक्टोरेट ऑफ व्होकेशनल एज्युकेशन अँड ट्रेनिंग | व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालनायलय |
| आयटीआय | इंडस्ट्रीअल ट्रेनिंग इंस्टिट्यूट | औद्योगिक प्रशिक्षण संस्था |
| एसएल | स्टेट लेवल | राज्यस्तरावरील |
| एसआय | सँक्शन इंटेक | मंजूर प्रवेशक्षमता |
| टीएफडब्ल्यू एस | ट्युशन फी व्हेवर स्कीम | शिक्षण शुल्क माफी योजना |

२. **व्याख्या,** - या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, -

(क) "प्रवेश उपस्थिती केंद्र" याचा अर्थ, जेथे उमेदवार प्रवेशाबाबतची कागदपत्रे सादर करून आणि शुल्काचा भरणा करून प्रवेश निश्चित करण्यासाठी उपस्थित राहील असे केंद्र, असा आहे;

(ख) "आवेदनपत्राचा नमुना" याचा अर्थ, उमेदवाराने प्रवेशाकरिता ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा विहित नमुना, असा आहे;

(ग) "समुचित प्राधिकारण" याचा अर्थ, जे पदविका पाठ्यक्रम किंवा शैक्षणिक विद्याशाखा यांना मान्यता देते व त्यांचे

विनियमन करते असे, राज्य वा केंद्र शासनाने घोषित केलेले प्राधिकरण, असा आहे;

(घ) "स्वायत्त संस्था" याचा अर्थ, ज्या संस्थेला महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने आणि महाराष्ट्र शासनाने स्वायत्तता प्रदान केलेली आहे अशी संस्था, असा आहे;

(ङ) "बाटू" याचा अर्थ डॉ बाबासाहेब आंबेडकर टेक्नोलोजिकल युनिव्हर्सिटी, लोणेरे असा आहे;

(च) "उमेदवार" याचा अर्थ, शासनाने वेळोवेळी अधिसूचित केल्यानुसार विविध व्यावसायिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशासाठी पात्र असणारे उमेदवार, असा आहे;

(छ) "केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप)" याचा अर्थ, सक्षम प्राधिकाऱ्याकडून उमेदवाराला तांत्रिक पदविका पाठयक्रमांमध्ये प्रवेश घेण्यासाठी एक खिडकी पारदर्शी पद्धतीने राबविण्यात येणारी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया असा आहे;

(ज) "सक्षम प्राधिकारी" याचा अर्थ, प्रवेश प्रक्रियेची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेला संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई असा आहे;

(झ) "पाठयक्रम" याचा अर्थ अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली आणि / किंवा भारतीय भेषजी परिषद,नवी दिल्ली यांनी मंजूरी दिलेल्या प्रत्येक संस्थेमधील, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, आणि हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान यामधील पदविका तांत्रिक पाठयक्रम, असा आहे;

(ञ) "विभाग" याचा अर्थ उच्च व तंत्र शिक्षण विभाग , महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ट) "पदविका" याचा अर्थ पदविका अभ्यासक्रमाच्या यशस्वी पूर्णतेनंतर संबंधित प्राधिकरणाकडून दिली जाणारी पदविका असा आहे;

(ठ) "संचालक" याचा अर्थ संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य असा आहे;

(ड) "डीटीई" याचा अर्थ तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य असा आहे;

(ढ) "सुविधा केंद्र" याचा अर्थ, जेथे ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे, कागदपत्रांची पडताळणी व तक्रारींचे निवारण करणे यांसारख्या सेवा पुरविल्या जातात, असे केंद्र, असा आहे;

(ण) "शुल्क" याचा अर्थ, शुल्क म्हणून निश्चित करण्यात आलेली रक्कम , असा आहे; आणि त्यामध्ये, शिकवणी शुल्क, ग्रंथालय शुल्क, जिमखाना शुल्क, परीक्षा शुल्क, विकास शुल्क, अथवा कोणत्याही अभ्यासानुवर्ती किंवा सह-अभ्यासानुवर्ती कार्यक्रमाकरिता देय असलेली रक्कम, प्रयोगशाळा शुल्क, माहिती पुस्तिका शुल्क आणि विद्यार्थ्यांकडून गोळा केलेली, अन्य कोणतीही रक्कम म्हणजेच एखाद्या शैक्षणिक संस्थेत पदविका पाठ्यक्रमाला प्रवेश दिलेल्या कोणत्याही उमेदवाराकडून, कोणत्याही प्रयोजनासाठी अशा संस्थेला देय असलेली रक्कम-मग ती कोणत्याही नावाने संबोधली जाणारी आणि कोणत्याही रीतीने स्वीकारलेली असो - यांचा समावेश होतो, परंतु त्यामध्ये, कोणत्याही वैकल्पिक वसतिगृह-निवास व्यवस्था, भोजनालय आकार आणि विद्यार्थी विमा शुल्क यांचा समावेश होणार नाही;

(त) "विदेशी विद्यार्थी" याचा अर्थ, जो भारताचा नागरिक नाही असा विद्यार्थी, असा आहे;

(थ) "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे;

(द) "मूळ जिल्हा" याचा अर्थ, या नियमाच्या नियम ५(१) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे महसूल जिल्हा क्षेत्र, असा आहे;

(ध) "एचएससी" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १२वी) परीक्षा अथवा मान्यताप्राप्त मंडळाकडून देण्यात येणारे, त्यास समतुल्य असे प्रमाणपत्र, असा आहे;

(न) "संस्था"याचा अर्थ, अशी शैक्षणिक संस्था जी अभियांत्रिकी/तंत्रज्ञान आणि फार्मसीमध्ये पदविका मिळण्यासाठी तांत्रिक शिक्षणातील अभियांत्रिकी व संबद्ध अभ्यासक्रमांशी संबंधित पाठ्यक्रम घेते असा आहे;

(प) "संस्थास्तरीय कोटा" याचा अर्थ, शासनाने व समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी जाहीर केल्यानुसार पात्र उमेदवारांच्या प्रवेशासाठी संस्थास्तरावर उपलब्ध असणाऱ्या जागा, असा आहे;

(फ) "परस्पर गुणवत्ता" याचा अर्थ, उमेदवारांच्या विविध वर्गांच्या /प्रवर्गाच्या संबंधात सक्षम प्राधिकारी यांनी जाहीर केलेला गुणानुक्रम, असा आहे;

(ब) "आयटीआय" याचा अर्थ, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्रमाणपत्र पाठ्यक्रम, असा आहे;

(भ) "आनुषंगिक प्रवेश" याचा अर्थ, समुचित प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वानुसार मंजूर पाठ्यक्रमांच्या दुसऱ्या वर्षाच्या जागांवरील विध्यार्थ्यांचा प्रवेश, असा आहे;

(म) "एमएसबीटीई" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम १९९७ (१९९७ चा महाराष्ट्र ३८) द्वारे स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, असा आहे;

(य) "अल्पसंख्यांकासाठी जागा" याचा अर्थ, ती संस्था ज्या अल्पसंख्यांक समाजाकरिता आहे अशा, राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकरिता राखून ठेवलेल्या जागा, असा आहे;

(र) "अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था" याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) अन्वये तसे करण्याचा अधिकार असणाऱ्या महाराष्ट्र राज्यामध्ये अधिवासी असलेल्या अल्पसंख्याक समाजातील व्यक्तींनी त्यांच्याकरिता स्थापन केलेली व प्रशासन केलेली, राज्य शासनाने अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून अधिसूचित केलेली शैक्षणिक संस्था, असा आहे;

(ल) "बिगर स्वायत्त संस्था" याचा अर्थ, ज्या स्वायत्त संस्था नाहीत अशा संस्था, असा आहे;

(व) "अनिवासी भारतीय (एनआरआय)" याचा अर्थ, आयकर अधिनियम, १९६१ याच्या कलम ६ च्या पोट-कलम (६) अन्वये "सर्व साधारण रहिवासी नसलेली" व्यक्ती, असा आहे, आणि त्यामध्ये विदेशी चलन व्यवस्थापन अधिनियम, १९९९ याच्या कलम २ च्या खंड (ब) अन्वये भारताबाहेर निवास करणाऱ्या व्यक्तीचा समावेश होतो आणि तसेच त्यामध्ये तिच्या बालकाचा वा पाल्याचाही समावेश होतो;

(श) "भारताचे समुद्रपार नागरिकत्व" याचा अर्थ, सरकारने नागरिकत्व अधिनियम, १९५५ च्या कलम ७ (क) अन्वये घोषित केलेला भारताचे (समुद्रपार) नागरिक म्हणून नोंदणी केलेला उमेदवार / व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये भारतीय वंशाच्या व्यक्तींचा समावेश होतो;

स्पष्टीकरण:- या खंडाच्या प्रयोजनार्थ, सर्व विद्यमान भारतीय वंशाच्या व्यक्ती ज्यांनी गृह मंत्रालय भारत सरकारच्या अधिसूचना क्र. २६०११/०४/९८/एफ (एक ) दिनांक १९ ऑगस्ट २००२ अनुसार नोंदणी केलेली असून त्या कार्डधारक आहेत व त्यांना आता गृह मंत्रालय भारत सरकारच्या अधिसूचना क्र. २५०२४ /९/२०१४/एफ (एक) दिनांक ९ जानेवारी २०१५ अनुसार भारताचे कार्डधारक समुद्रपार नागरिक समजण्यात येईल;

(ष) "मूळ जिल्ह्याबाहेरील (ओएचडी)" याचा अर्थ, मूळ जिल्ह्यातून नसलेला, असा आहे;

(स) "भारतीय वंशाची व्यक्ती (पीआयओ)" याचा अर्थ, जी व्यक्ती भारताव्यतिरिक्त अन्य देशाची नागरिक आहे परंतु, जी कोणत्याही वेळी भारताची नागरिक होती; किंवा जिच्या मातापित्यांपैकी किंवा आजी-आजोबांपैकी कोणीही एक, भारताच्या संविधानाच्या भाग दोनच्या तरतुदीनुसार अथवा नागरिकत्व अधिनियम, १९५५ अन्वये भारताची नागरिक होती, अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे;

(ह) "अर्हता परीक्षा" याचा अर्थ, ज्या परीक्षेच्या आधारे एखादा उमेदवार प्रवेशाकरिता पात्र होतो अशी परीक्षा किंवा तिला समतुल्य असलेली परीक्षा, असा आहे;

(ळ) "मंजूर प्रवेश क्षमता" याचा अर्थ, समुचित प्राधिकरणाने एखाद्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशाच्या समुचित स्थरावर प्रत्येक पाठ्यक्रमाला किंवा विद्याशाखेत एकाच शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी मंजूर किंवा मान्य केलेल्या एकूण जागा, असा आहे;

(क्ष) "एसएससी" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा किंवा मान्यताप्राप्त मंडळाकडून देण्यात येणारे त्यास समतुल्य असे प्रमाणपत्र, असा आहे;

(ज्ञ) "अधिसंख्य जागा" याचा अर्थ, समुचित प्राधिकरणाने आणि शासनाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या, मंजूर प्रवेशक्षमतेहून अधिक असतील अशा जागा, असा आहे;

(कक) "विद्यापीठ" यास, विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ याच्या कलम २ च्या खंड (च) मध्ये त्यास जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल;

(खख) "टीएफडब्लूएस" याचा अर्थ, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांची ट्यूशन फी वेव्हर योजना, असा आहे.

## ३. सक्षम प्राधिकारीची भूमिका आणि जबाबदारी

(१) सक्षम प्राधिकारी, महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित, बाटू आणि खाजगी विनाअनुदानित संस्थांमध्ये तांत्रिक पदविका अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये (कॅप) मध्ये सहभागी होण्यासाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागवतील.

(२) सक्षम प्राधिकारी, तक्रार निवारण प्राधिकारी म्हणून जागावाटप आणि प्रवेशाशी संबंधित उमेदवारांकडून (खाजगी विद्यापीठ, स्वयं वित्त पुरवठा विद्यापीठ वगळून) प्राप्त झालेल्या निवेदनांवर कार्यवाही करेल.

(३) सक्षम प्राधिकारी द्वारे प्रथम / थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंबंधी घेतलेले सर्व निर्णय अंतिम आणि सर्व संबंधितांवर बंधनकारक असतील.

(४) संपूर्ण प्रवेश प्रक्रियेच्या सहज संचालनासाठी सक्षम प्राधिकारी पूर्णपणे जबाबदार असेल.

(५) प्रवेश प्रक्रिया पार पाडण्यासाठी आवश्यक व्यक्ती / संस्थांची सेवापुरवठादार म्हणून नियुक्ती करेल. प्रवेश प्रक्रियेशी संबंधित सर्व कामकाजाची अंमलबजावणी करण्यासाठी वित्तीय अधिकारांचा वापर करेल.

(६) शासनाच्या पूर्व परवानगीने प्रवेश प्रक्रियेसाठी अर्जाचे शुल्क निर्धारित करेल.

(७) स्वीय प्रपंजी खात्यामध्ये (पीएलए) प्रवेश प्रक्रियेसाठी निर्धारित केलेल्या शुल्काद्वारे गोळा केलेला निधी जमा करेल.

(८) प्रवेश प्रक्रियेच्या सहज संचालनासाठी शुल्काद्वारे गोळा केलेल्या निधीचा वापर करुन योग्य प्रणाली विकसित करेल.

(९) शासनाच्या पूर्व परवानगीने प्रवेश प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना मानधन देईल.

## ४. पात्रतेचे निकष

| अनु.क्र. | व्यावसायिक पाठ्यक्रमाचे नाव | प्रवेशासाठी आवश्यक पात्रतेच्या अटी व शर्ती |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका | **(क) दहावी नंतरच्या पदविका पाठ्यक्रमाचे प्रथम वर्ष,-**<br>**(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणारे उमेदवार, जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील स्थलांतरित उमेदवारी असलेला उमेदवार,-**<br>(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे;<br>(दोन) त्याने किमान ३५ टक्के एवढया गुणांसह माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (एसएससी) (इयत्ता १० वी) परीक्षा किंवा तिच्याशी समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केली असली पाहिजे.<br>टीप: महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार संस्थास्तरावरील जागांसाठी पात्र असतील.<br><br>**(२) अनिवासी भारतीय / भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती / भारतीय वंशाच्या व्यक्तींची व आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक,-**<br>(एक) उमेदवाराने किमान ३५ टक्के एवढया गुणांसह माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (एसएससी)(इयत्ता १० वी) परीक्षा किंवा तिच्याशी समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केली असली पाहिजे;<br>(दोन) तो समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी अधिसूचित केलेली प्रवेशासाठीची इतर आवश्यक पात्रता धारण करत असावा.<br><br>**(ख) दहावी नंतरच्या पदविका पाठयक्रमाचे थेट द्वितीय वर्ष,-**<br>**(१)महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणारे उमेदवार, -**<br>(एक) उमेदवार हा भारतीय नागरिक असला पाहिजे;<br>(दोन) त्याने १० + २ परीक्षा उत्तीर्ण केलेली असली पाहिजे; पुढीलपैकी कोणतेही तीन विषयांसह (भौतिकशास्त्र / गणित / रसायनशास्त्र / कॉम्पुटर सायन्स / इलेक्ट्रॉनिक्स / इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी / जीवशास्त्र / इन्फॉर्मेटिक्स प्रॅक्टिसेस/ बायोटेक्नॉलॉजी / टेक्निकल व्होकेशनल सब्जेक्ट / ॲग्रिकल्चर / अभियांत्रिकी ग्राफिक्स / बिझनेस स्टडीज / इंटरप्रेनरशिप);<br>किंवा |

| | | |
|---|---|---|
| | | इयत्ता १० वी नंतर २ वर्ष कालावधीचा आयटीआय अभ्यासक्रम पूर्ण केलेला असला पाहिजे. असे उमेदवार द्वितीय वर्षाच्या कोणत्याही अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका पाठयक्रमांमध्ये प्रवेश घेण्यासाठी पात्र असतील.<br>(विविध पार्श्वभूमीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांकडून अपेक्षित शैक्षणिक निष्पत्ती (लर्निंग आऊटकम) साध्य करण्यासाठी, संलग्नता प्रदान करणारे प्राधिकरण, अशा विद्यार्थ्यांकरिता, अभ्यासक्रमांमध्ये योग्य ब्रिज कोर्सचा उदा. गणित, भौतिकशास्त्र, इंजिनीरिंग ड्रॉइंग इ. अंतर्भाव करतील.)<br>टीप : महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार संस्थास्तरावरील जागांसाठी पात्र असतील.<br>**(ग) बारावी नंतरच्या सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी मधील पदविका पाठयक्रम,-**<br>**(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणारे उमेदवार, जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील स्थलांतरित उमेदवारी असलेला उमेदवार,-**<br>(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे;<br>(दोन) त्याने इंग्रजी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित हे विषय घेऊन एचएससी (इयत्ता १२ वी)(विज्ञान) परीक्षा उत्तीर्ण केलेली असली पाहिजे.<br>टीप : महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार संस्थास्तरावरील जागांसाठी पात्र असतील.<br>**(२) अनिवासी भारतीय / भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती / भारतीय वंशाच्या व्यक्तींची व आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक,-**<br>(एक) उमेदवाराने इंग्रजी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित हे विषय घेऊन एचएससी (इयत्ता१२ वी)(विज्ञान) परीक्षा उत्तीर्ण केलेली असली पाहिजे;<br>(दोन) तो समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी अधिसूचित केलेली प्रवेशासाठीची इतर आवश्यक पात्रता धारण करत असावा. |
| २ | औषधनिर्माण-शास्त्र पदविका | **(१)महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणारे उमेदवार, -**<br>(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे;<br>(दोन) त्याने भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित किंवा जीवशास्त्र विषयांसह एचएससी (विज्ञान शाखा) परीक्षा उत्तीर्ण केलेली असली पाहिजे.<br>किंवा<br>(दोन) उपरोक्त परीक्षेच्या समतुल्य म्हणून फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाने मंजूर केलेली इतर कोणतीही पात्रता |

| | | |
|---|---|---|
| | | टीप : महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार संस्थास्तरावरील जागांसाठी पात्र असतील.<br>**(२) अनिवासी भारतीय / भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती / भारतीय वंशाच्या व्यक्तींची व आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक,-**<br>(एक) त्याने भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित किंवा जीवशास्त्र विषयांसह एचएससी (विज्ञान शाखा) परीक्षा उत्तीर्ण केलेली असली पाहिजे;<br>किंवा<br>(दोन) उपरोक्त परीक्षेच्या समतुल्य म्हणून फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाने मंजूर केलेली इतर कोणतीही पात्रता |
| ३ | हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पदविका | **(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणारे उमेदवार, जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील स्थलांतरित उमेदवारी असलेला उमेदवार,-**<br>(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे;<br>(दोन) त्याने एचएससी (इयत्ता १२ वी) परीक्षा कमीत कमी ३५% गुणांसह उत्तीर्ण केलेली असली पाहिजे.<br>टीप : महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार संस्थास्तरावरील जागांसाठी पात्र असतील.<br>**(२) अनिवासी भारतीय / भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती / भारतीय वंशाच्या व्यक्तींची व आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक,-**<br>(एक) त्याने एचएससी (इयत्ता १२ वी) परीक्षा कमीत कमी ३५% गुणांसह उत्तीर्ण केलेली असली पाहिजे.<br>(दोन) तो समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी अधिसूचित केलेली प्रवेशासाठीची इतर आवश्यक पात्रता धारण करत असावा. |

### ४ क. प्रथम वर्ष दहावीनंतरचे अभियांत्रिकी / तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम

- येथे वापरलेल्या “एकूण गुण” या शब्दाचा अर्थ खालीलप्रमाणे आहे

  (क) महाराष्ट्र राज्य मंडळाच्या उमेदवारांसाठी

  एसएससी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी, एकूण गुण हे, विचारात घेतलेल्या ५ विषयांचे एकूण गुण आणि जे गुणपत्रिकेमध्ये नमुद केलेले आहेत ते धरण्यात येतील.

  (ख) आयसीएसई उमेदवारांसाठी

  (एक) केवळ गट १ व गट २ विषयांच्या आधारे प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवारांसाठी, गट १ व गट २

मधील एकूण विषयांपैकी, जिथे त्याने / तिने जास्तीत जास्त गुण मिळविले असतील अशा पाच विषयांच्या प्राप्त गुणांची बेरीज म्हणजे एकूण गुण असतील.

(दोन) गट १, गट २ व गट ३ विषयांच्या आधारे प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवारांसाठी, सर्व गटांमधील प्राप्त गुणांची बेरीज म्हणजे एकूण गुण असतील.

(ग) सीबीएसई उमेदवारांसाठी

एकूण गुण म्हणजे उमेदवाराच्या गुणपत्रिकेवर घोषित केलेल्या सर्व विषयांमध्ये, उमेदवाराने प्राप्त केलेल्या एकूण गुणांची बेरीज असेल.

### ४ ख. थेट द्वितीय वर्ष दहावीनंतरचे अभियांत्रिकी / तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम

- थेट द्वितीय वर्षाच्या पदविका प्रवेशासाठी कोणताही संस्थास्तरावरील कोटा नाही, तथापि, शेवटच्या फेरीनंतर राहिलेल्या रिक्त जागा संस्थेद्वारे भरल्या जाऊ शकतात, ज्यास संस्थास्तरावरील कोटा म्हणून संबोधले जाऊ शकते.
- आयटीआय उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांसाठी, येथे वापरल्या जाणा-या “एकूण गुण” या शब्दाचा अर्थ खालीलप्रमाणे आहे.

  (क) आयटीआय (सीटीएस किंवा एटीएस) आणि २ वर्ष कालावधीचे एमएसबीव्हीई/एमएसबीएसडी यांचे अभ्यासक्रम: अंतिम वर्षामध्ये/शेवटचे दोन सत्रांमध्ये एकूण प्राप्त (तिसरे आणि चौथे सत्र) हे एकूण गुण म्हणुन गणले जातील.

  (ख) सीओई कोर्स / मूलभूत क्षेत्र १ वर्षाच्या कालावधीसाठी: एकूण गुण हे सर्व ३ गटांची (ग्रुप) बेरीज असतील.
- थेट द्वितीय वर्षाच्या प्रवेशासाठी पात्रता गट परिशिष्ट-III मध्ये दर्शविण्यात आलेले आहेत.
- थेट द्वितीय वर्ष पोस्ट एसएससी पदविका प्रवेशासाठी तांत्रिक व्यावसायिक विषयांची यादी (टेक्निकल व्होकेशनल सब्जेक्ट) परिशिष्ट-IIIA मध्ये दर्शविण्यात आलेले आहेत.

### ४ ग. सर्वसाधारण टिप

- एसएससी, एचएससी, आयटीआय किंवा त्याच्या समकक्ष परिक्षेत अक्षरी ग्रेड वाटप केले असल्यास उमेदवाराने अर्ज सादर करतानाच्या वेळी संबंधित सक्षम प्राधिकरण किंवा बोर्डाकडून अक्षरी ग्रेडचे समकक्ष गुणांमध्ये रूपांतरणाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. या समकक्ष गुणांच्या आधारे पात्रतेचा निर्णय केला जाईल.
- राज्य मंडळ किंवा केंद्रीय मंडळांव्यतिरिक्त एसएससी उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून (एमएसबीएसएचएसई) समकक्ष प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- ज्या उमेदवाराने इतर कोणत्याही संस्थेत प्रवेश मिळविला आहे त्या उमेदवाराने, त्या संस्थेत त्याचे याआधीचा शाळा/महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याचे मूळ प्रमाणपत्र जमा केले आहे हे दर्शविणारा माहितीपुस्तिकेमधील दिलेला “प्रोफोर्मा-N” सादर करावा.

## ५. उमेदवारीचे प्रकार,-

*(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी,-*

| प्रकार | पात्रतेचे निकष | मूळ जिल्हा |
|---|---|---|
| "ए" | **(क) एसएससी नंतरच्या पदविका पाठ्यक्रमाचे प्रथम वर्षासाठी :** महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त संस्थेमधून इयत्ता एसएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला उमेदवार;<br>**(ख) एचएससी नंतरच्या पदविका पाठ्यक्रमासाठी ,**<br>(एक) औषधनिर्माणशास्त्र- महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त संस्थेमधून भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित किंवा जीवशास्त्र विषयांसह एचएससी (विज्ञान शाखा) परीक्षा उत्तीर्ण झालेला उमेदवार;<br>किंवा<br>महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त संस्थेमधून उपरोक्त परीक्षेच्या समतुल्य म्हणून फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाने मंजूर केलेली इतर कोणतीही पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेला उमेदवार;<br>(दोन) हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान- महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त संस्थेमधून एचएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला उमेदवार;<br>(तीन) सरफेस कोटिंग तंत्रज्ञान- महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त संस्थेमधून इंग्रजी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित विषयासह एचएससी परीक्षा, उत्तीर्ण झालेला उमेदवार;<br>**(ग) एसएससी नंतरच्या पदविका पाठ्यक्रमाचे थेट द्वितीय वर्षासाठी** - महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त संस्थेमधून १० + २ परीक्षा, पुढीलपैकी कोणतेही तीन विषयांसह (भौतिकशास्त्र / गणित / रसायनशास्त्र / कॉम्प्युटर सायन्स / इलेक्ट्रॉनिक्स / इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी / जीवशास्त्र / इन्फॉर्मेटिक्स प्रॅक्टिसेस/ बायोटेक्नॉलॉजी / टेक्निकल व्होकेशनल सब्जेक्ट / ॲग्रिकल्चर / अभियांत्रिकी ग्राफिक्स / बिझनेस स्टडीज / इंटरप्रेनरशिप) उत्तीर्ण केलेली असली पाहिजे;<br>किंवा एसएससी नंतरचा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून २ वर्षांचा पाठ्यक्रम महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त संस्थेमधून उत्तीर्ण झालेले उमेदवार; | अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे ठिकाण ज्या जिल्हा क्षेत्रात येते तो जिल्हा |

| | | |
|---|---|---|
| “बी” | जो उमेदवार वरील प्रकार-ए मधील निकषाची पूर्तता करीत नसेल, परंतु तो किंवा त्याचे वडील किंवा आई महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असून त्यांच्याकडे अधिवास प्रमाणपत्र आहे, असा उमेदवार. | अधिवास प्रमाणपत्र देणा-या प्राधिकरणाचे ठिकाण ज्या जिल्ह्यात येत असेल तो जिल्हा. |
| “सी” | जो उमेदवार वरील प्रकार-ए किंवा प्रकार-बी मधील निकषाची पूर्तता करीत नसेल, परंतु ज्या उमेदवाराचे वडील किंवा आई केंद्रशासनाचे किंवा केंद्रशासनाच्या उपक्रमातील कर्मचारी आहेत व ज्यांची पदस्थापना महाराष्ट्र राज्यात झालेली आहे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेस आवेदनपत्र सादर करण्याच्या शेवटच्या तारखेच्या आधी ते महाराष्ट्र राज्यात कामावर रुजू झालेले आहेत, असा उमेदवार. | उमेदवाराच्या वडिलांच्या किंवा आईच्या पदस्थापनेचे ठिकाण ज्या जिल्ह्यात येत असेल तो जिल्हा |
| “डी” | जो उमेदवार वरील प्रकार-ए, प्रकार-बी, व प्रकार -सी मधील निकषांची पूर्तता करीत नसेल, परंतु त्याचे वडील किंवा आई महाराष्ट्र शासनाचे किंवा महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमाचे कर्मचारी किंवा निवृत्त कर्मचारी आहेत. | उमेदवाराच्या वडिलांच्या किंवा आईच्या पदस्थापनेचे किंवा निवृत्त झाल्यास निवृत्तीनंतर स्थायिक झाल्याचे ठिकाणी किंवा त्यांची जर महाराष्ट्राबाहेर प्रतिनियुक्ती करण्यात आली असेल तर, अंतिम पदस्थापनेचे ठिकाण, ज्या जिल्ह्यात येत असेल तो जिल्हा |
| “ई” | (क) एसएससी नंतरच्या पदविका पाठ्यक्रमाच्या प्रथम वर्षासाठी :<br>महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केल्याप्रमाणे महाराष्ट्र-कर्नाटक सीमाक्षेत्रातील मान्यताप्राप्त संस्थेमधून व त्या भागातील रहिवासी असलेला, इयत्ता एसएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला, आणि ज्यांची मातृभाषा मराठी आहे असा उमेदवार ;<br><br>(ख) एचएससी नंतरच्या पदविका पाठ्यक्रमाचे प्रथम वर्षासाठी ,<br>(एक) औषधनिर्माणशास्त्र- महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केल्याप्रमाणे महाराष्ट्र-कर्नाटक सीमाक्षेत्रातील मान्यताप्राप्त संस्थेमधून व त्या भागातील रहिवासी असलेला, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित किंवा जीवशास्त्र विषयांसह एचएससी (विज्ञान शाखा) परीक्षा उत्तीर्ण झालेला आणि ज्यांची मातृभाषा मराठी आहे, असा उमेदवार; | उमेदवाराचा मूळ जिल्ह्याबाहेरील जागांसाठी किंवा राज्यस्तरावरील जागांसाठी विचार करण्यात येईल |

| | | |
|---|---|---|
| | किंवा<br><br>महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केल्याप्रमाणे महाराष्ट्र-कर्नाटक सीमाक्षेत्रातील मान्यताप्राप्त संस्थेमधून व रहिवासी असलेला, उपरोक्त परीक्षेच्या समतुल्य म्हणून फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाने मंजूर केलेली इतर कोणतीही पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेला आणि ज्यांची मातृभाषा मराठी आहे, असा उमेदवार;<br><br>(दोन) हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान- महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केल्याप्रमाणे महाराष्ट्र-कर्नाटक सीमाक्षेत्रातील मान्यताप्राप्त संस्थेमधून व त्या भागातील रहिवासी असलेला, एचएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला, आणि ज्यांची मातृभाषा मराठी आहे, असा उमेदवार;<br><br>(तीन) सरफेस कोटिंग तंत्रज्ञान- महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केल्याप्रमाणे महाराष्ट्र-कर्नाटक सीमाक्षेत्रातील मान्यताप्राप्त संस्थेमधून व त्या भागातील रहिवासी असलेला, इंग्रजी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित विषयासह एचएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला, आणि ज्यांची मातृभाषा मराठी आहे, असा उमेदवार;<br><br>(ग)एसएससी नंतरच्या पदविका पाठ्यक्रमाच्या थेट द्वितीय वर्षासाठी - महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केल्याप्रमाणे महाराष्ट्र-कर्नाटक सीमाक्षेत्रातील मान्यताप्राप्त संस्थेमधून व त्या भागातील रहिवासी असलेला, १० + २ परीक्षा, पुढीलपैकी कोणतेही तीन विषयांसह (भौतिकशास्त्र / गणित / रसायनशास्त्र / कॉम्पुटर सायन्स / इलेक्ट्रॉनिक्स / इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी / जीवशास्त्र / इन्फॉर्मेटिक्स प्रॅक्टिसेस/ बायोटेक्नॉलॉजी / टेक्निकल व्होकेशनल सब्जेक्ट / ॲग्रिकल्चर / अभियांत्रिकी ग्राफिक्स / बिझनेस स्टडीज / इंटरप्रेनरशिप) उत्तीर्ण झालेला आणि ज्यांची मातृभाषा मराठी आहे, असा उमेदवार;<br>किंवा महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केल्याप्रमाणे महाराष्ट्र-कर्नाटक सीमाक्षेत्रातील मान्यताप्राप्त संस्थेमधून व त्या भागातील रहिवासी असलेला, एसएससी नंतरचा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून २ वर्षाचा पाठ्यक्रम उत्तीर्ण झालेला आणि ज्यांची मातृभाषा मराठी आहे, असा उमेदवार; | |

*(२) अखिल भारतीय उमेदवारी,-* भारतीय नागरिकत्व असणारे उमेदवार, या प्रवर्गाखाली पात्र आहेत.

*(३) अल्पसंख्यांक उमेदवारी,-*राज्यांतर्गत असलेल्या आणि शासनाने अधिसूचित केलेल्या एखाद्या विशिष्ट भाषिक किंवा धार्मिक अल्पसंख्यांक समाजातील, महाराष्ट्राचे अधिवासी असलेले उमेदवार या प्रवर्गाखाली पात्र आहेत.

*(४) अनिवासी भारतीय उमेदवारी,-* अधिनियमाच्या कलम २ खंड (व) मध्ये दिलेल्या व्याख्येतील अटींची पूर्तता करणारे, उमेदवार या प्रवर्गाखाली पात्र आहेत.

*(५) विदेशी विद्यार्थी किंवा भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेले किंवा भारतीय वंशाची व्यक्ती असलेले उमेदवार,-*अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (त) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे विदेशी विद्यार्थी, नियम २ च्या खंड (श) मध्ये व्याख्या करण्यात आलेले भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेले उमेदवार व अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (स) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे भारतीय वंशाची व्यक्ती असलेले उमेदवार, या प्रवर्गाखाली पात्र आहेत.

*(६) जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र स्थलांतरितांसाठी उमेदवारी,-*

(क) आतंकवादी कारवायांमुळे १९९० पासून जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधून भारताच्या कोणत्याही भागात किंवा जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र च्या असुरक्षित सीमाक्षेत्रातून, जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील त्यामानाने सुरक्षित ठिकाणी विस्थापित होऊन आलेले आहेत अशा नागरिकांची मुले; किंवा

(ख) भारतीय प्रशासकीय सेवा (भाप्रसे) किंवा भारतीय पोलीस सेवा (भापोसे) किंवा भारतीय विदेश सेवा (भाविसे) यामधील अधिकाऱ्यांची मुले आणि अतिरेकी कारवायांचा बिमोड करण्यासाठी जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मध्ये बदली झालेल्या, तसेच केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी आवेदनपत्र सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा त्यापूर्वी कामावर रुजू झालेल्या लष्करी व निमलष्करी दलातील कर्मचाऱ्यांची मुले; किंवा

(ग) अतिरेकी कारवायांचा सामना करण्यासाठी कार्यरत असलेल्या जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र पोलीस दलातील कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची मुले,

(घ) काश्मीर खोऱ्यांमध्ये राहत असलेल्या काश्मिरी पंडित/काश्मिरी हिंदू कुटुंबे (निवासी) आणि ज्यांच्याकडे अधिवास प्रमाणपत्र आहे अशा नागरिकांची मुले;

या प्रवर्गाखाली पात्र असतील.

६. **विविध पाठयक्रमांकरिता मंजूर प्रवेशक्षमता, आरक्षण व अधिसंख्य जागा,-** (१) जे प्राधिकरण संबंधित पाठयक्रमांना मान्यता देण्याकरिता सक्षम आहे त्या प्राधिकरणाने दिलेल्या मान्यतेनुसार आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने दिलेल्या संलग्नतेनुसार प्रथम वर्ष पदविका पाठ्यक्रमाची व थेट द्वितीय वर्ष (आनुषंगिक प्रवेश) पदविका पाठयक्रमांची मंजूर प्रवेशक्षमता असेल. थेट द्वितीय वर्ष (आनुषंगिक प्रवेश) पदविका पाठ्यक्रमांना प्रवेशासाठी उपलब्ध जागांची गणना **अनुसूची-तीन** मध्ये दिल्याप्रमाणे करण्यात येईल.

(२) प्रवेश प्रक्रियेअंतर्गत उपलब्ध जागांमध्ये विविध आरक्षणांचे प्रावधान व त्यासाठी लागणारी प्रमाणपत्रे **अनुसूची-चार** मध्ये नमूद केले आहे.

(३) खाजगी व्यायसायिक शैक्षणिक संस्थांमध्ये मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा अधिक असलेल्या आणि समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी मान्यता दिल्यानुसार अधिसंख्य जागा प्रवेशासाठी उपलब्ध असतील.

**७. जागावाटप,-** महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांसाठी मूळ जिल्ह्यातील तसेच मूळ जिल्ह्याबाहेरील आणि राज्यस्तरीय जागांच्या वाटपाची टक्केवारी हि शासन धोरणानुसार, एसएससी नंतरच्या विविध पदविका पाठयक्रमांच्या प्रथम वर्षासाठी अनुसूची-एक, एचएससी नंतरच्या पदविका पाठ्यक्रमाच्या प्रथम वर्षासाठी अनुसूची- दोन आणि एसएससी नंतरच्या पदविका पाठ्यक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षासाठी अनुसूची- तीन मध्ये, विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल ;

(१) **महाराष्ट्र राज्य उमेदवारीसाठी जागा,-** या नियमाच्या नियम ५(१) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेले उमेदवार हे या जागांसाठी पात्र असतील.

(२) **अल्पसंख्याक कोटयातील जागा,-** नियम ५(३)मध्ये नमूद केलेली उमेदवारी असणारे उमेदवार **अनुसूची-एक, अनुसूची-दोन** व **अनुसूची-तीन** मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे उपलब्ध जागांसाठी पात्र असतील. विनाअनुदानित अल्पसंख्यांक संस्थांमधील या जागा राज्य सरकारच्या धोरणानुसार भरल्या जातील आणि मंजूर प्रवेश क्षमतेच्या एक्कावन्न टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतक्या जागांवरील हे प्रवेश (अ-शासकीय अनुदानित अल्पसंख्याक संस्थेच्या बाबतीत पन्नास टक्के), ती संस्था ज्या अल्पसंख्यांक समाजाची असेल अशा, राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकडून, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे परस्पर गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

(३) **संस्थास्तरावरील कोटा,-**संस्थेला, पात्र उमेदवारांना संस्था स्तरावर **अनुसूची-एक, अनुसूची-दोन,** व **अनुसूची-तीन** मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार उपलब्ध जागांवर प्रवेश देता येतील, हे प्रवेश खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येतील,-

(एक) या नियमाच्या नियम ५(१), ५(२), ५(३), ५(४) आणि ५(६) मध्ये नमूद करण्यात आलेली उमेदवारी असणारे उमेदवार या कोट्यातील जागांवर प्रवेशासाठी पात्र असतील;

(दोन) जास्तीत जास्त ५ टक्के जागा, समुचित प्राधिकरणाची मान्यता असल्यास अनिवासी भारतीय उमेदवारांमधून संस्था स्तरावर भरता येतील;

(तीन) अनिवासी भारतीय उमेदवारांसाठी राखीव असलेल्या जागा रिक्त राहिल्यास अशा रिक्त जागा संस्थेस अखिल भारतीय उमेदवारी असणाऱ्या पात्र उमेदवारामधून भारता येतील.

परंतु या रिक्त जागा भरताना महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणाऱ्या उमेदवारांना परस्पर गुणवत्तेच्या आधारे प्राधान्य देण्यात येईल.

(४) **अधिसंख्य जागा,-**

(क) भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या / भारतीय वंशाच्या व्यक्ती, विदेशी विद्यार्थी, आणि आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले,-

(एक) या नियमांच्या नियम ५(५) मध्ये दिल्यानुसार उमेदवारी असणारे आणि आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले या अधिसंख्य जागासाठी पात्र असतील;

(दोन) या जागा संस्थेच्या मंजूर प्रवेश क्षमतेच्या कमाल १५ टक्के किंवा समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी

विहित केल्यानुसार असतील. या १५ टक्के जागांपैकी एक तृतीयांश जागा आखाती देशातील भारतीय कामगारांच्या मुलांसाठी राखीव असतील व दोन तृतीयांश जागा भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेले/ भारतीय वंशाच्या व्यक्ती किंवा विदेशी विद्यार्थी असलेल्या उमेदवारांसाठी, राखीव असतील;

(तीन) या जागा, संस्था, या नियमांच्या नियम ८ मध्ये दिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करून उमेदवारांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे भरतील.

(चार) जर आखाती देशातील भारतीय कामगारांच्या मुलांसाठी राखीव असलेल्या १/३ जागांपैकी एखाद्या पाठ्यक्रमातील जागा रिक्त राहिल्या तर, अशा रिक्त जागा, भारताचे समुद्रपार नागरिक (ओसीआय), भारतीय वंशाच्या व्यक्ती (पीआयओ) किंवा विदेशी विद्यार्थी यांच्या उमेदवारांसाठी राखीव असलेल्या २/३ जागेमध्ये समाविष्ट करुन या उमेदवारांमधून भरण्यात येतील आणि जर भारताचे समुद्रपार नागरिक (ओसीआय), भारतीय वंशाच्या व्यक्ती (पीआयओ) किंवा विदेशी विद्यार्थी यांच्या उमेदवारांकरिता राखीव असलेल्या २/३ जागांपैकी जागा रिक्त राहिल्या तर, अशा रिक्त जागा, आखाती देशांतील भारतीय कामगारांच्या मुलांसाठी राखीव असलेल्या १/३ जागेमध्ये समाविष्ट करुन या उमेदवारांमधून भरण्यात येतील:

परंतु आणखी असे की, विदेशी विद्यार्थी (एफएन), भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या (ओसीआय) / भारतीय वंशाच्या व्यक्ती (पीआयओ), आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले यांच्या करिता असलेल्या कोट्यातील कोणतीही जागा रिक्त राहिल्यास, अशा जागा अनिवासी भारतीयांच्या जागांसाठी समुचित प्राधिकरणाकडून मान्यता असण्याच्या अधीन राहून, अनिवासी भारतीय उमेदवारी असलेल्या उमेदवारांमधून भरता येईल.

(ख) जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधून विस्थापित उमेदवारी असणारे उमेदवार,-

(एक) या नियमाच्या नियम ५(६) मध्ये नमूद करण्यात आलेली उमेदवारी असणारे उमेदवार या जागासाठी पात्र असतील;

(दोन) या कोट्यातील जागांची संख्या शासनाच्या धोरणानुसार असेल;

(तीन) या जागा सक्षम प्राधिकारी भरेल.

**(५) आवेदनपत्र मागविणे,-**

(१) व्यावसायिक पाठ्यक्रमाकरिता उपलब्ध जागांवर उमेदवारांच्या प्रवेशासाठी खालीलप्रमाणे कार्यपद्धती असेल,-

(क) या नियमांच्या नियम *७(१)*, *७(२)* आणि *७(४)*(ख) मध्ये नमूद केलेली उमेदवारी असणारे उमेदवार सक्षम प्राधिकरणाकडे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून (कॅपमधून) प्रवेश मिळावा यासाठी आवेदनपत्र सादर करतील;

(ख) या नियमांच्या नियम *७(३)* व *७(४)*(क) मध्ये नमूद केलेली उमेदवारी असणारे उमेदवार प्रथम सक्षम प्राधिकरणाकडे कागद पत्रांची तपासणी करण्यासाठी व त्यानंतर नियम *१३* मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अशा उमेदवारांना परस्पर गुणवत्तेच्या आधारे प्रवेश देणे संस्थाना शक्य व्हावे म्हणून संबंधित संस्थेकडे आवेदनपत्र सादर करतील;

(२) उमेदवाराने आवेदनपत्राचा नमुना भरतेवेळी लागू असतील त्याप्रमाणे आवश्यक प्रमाणपत्रे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने विहित केलेल्या आवश्यक प्रपत्रात सादर करावीत.

८. **गुणवत्ता यादी तयार करणे,- (१) गुणानुक्रम देणे ,-** ज्या उमेदवाराने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश मिळण्यासाठी आवेदनपत्र सादर करण्याकरिता विनिर्दिष्ट केलेल्या अंतिम दिनांकास किंवा त्या दिनांकापूर्वी आवेदनपत्र सादर केलेले आहे, अशा सर्व पात्र उमेदवारांना गुणानुक्रम देण्यात येईल. गुणवत्ता यादी सामायिक प्रवेश परीक्षेतील प्राप्तांकाच्या किंवा गुणांच्या आधारे किंवा अर्हता परीक्षेतील गुणांच्या आधारे किंवा या नियमाच्या पोटनियम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निकषानुसार तयार करण्यात येईल.

**(२) पडताळणीमुळे गुणांमध्ये होणारा बदल,-** गुणांची पडताळणी केल्यामुळे अर्हता परीक्षेमधील गुणांमध्ये फेरबदल झाले असतील आणि संबंधित समुचीत प्राधिकरणाने किंवा मंडळाने ते गुण यथोचितरीत्या प्रमाणित केलेले असतील तर, ते गुण, सक्षम प्राधिकाऱ्याला किंवा त्याच्या पदनिर्देशित प्रतिनिधींना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून प्रवेशासाठी अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध होण्याच्या दिवशी ५.०० वाजे पर्यंत किंवा त्या अगोदर कळविण्यात यावेत.

**(३) विविध पाठ्यक्रमांच्या प्रवेशासाठी गुणानुक्रम देणे,-** ***(क) एसएससी नंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका पाठ्यक्रमातील प्रवेशासाठी,-***पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी ही, एसएससी परीक्षेत उमेदवारास मिळालेल्या एकत्रित गुणांच्या (जर अतिरिक्त गुण गुणपत्रिकेत नोंदवले असल्यास त्यासह) टक्केवारीच्या आधारे तयार करण्यात येईल किंवा वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने तयार करण्यात येईल.

परंतु, सारखीच टक्केवारी असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पध्दतीने ठरविण्यात येईल,-

(क) एसएससी मध्ये गणित विषयातील अधिकतम गुण;

(ख) एसएससी मध्ये विज्ञान विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी;

(ग) एसएससी मध्ये इंग्रजी विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी;

(घ) एचएससी विज्ञान उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्य;

(ङ) एचएससी (किमान क्षमतावर आधारित असलेले व्यावसायिक पाठ्यक्रम) उमेदवारास प्राधान्य;

(च) २ वर्षे कालावधीचा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा व्यवसाय पाठ्यक्रम उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्य;

(छ) इंटरमेडिएट श्रेणी चित्रकला परीक्षा उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्य.

***(ख) एसएससी नंतरच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका पाठ्यक्रमाच्या थेट व्दितीय वर्षातील प्रवेशासाठी,-*** पात्र उमेदवारांच्या अर्हता परीक्षेनुसार प्रत्येकाची स्वतंत्र गुणवत्ता यादी अर्हता परीक्षमध्ये मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीच्या आधारे तयार करण्यात येईल.

परंतु, सारखीच टक्केवारी असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पध्दतीने ठरविण्यात येईल,-

(क) एसएससी परीक्षेच्या गणित विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी;

(ख) एसएससी परीक्षेच्या विज्ञान विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी;

(ग) एसएससी परीक्षेतील इंग्रजी विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी.

***(ग) एचएससी नंतरच्या सरफेस कोटिंग तंत्रज्ञान पदविका पाठ्यक्रमास प्रवेशासाठी,-*** एचएससी परीक्षेतील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित या विषयामधील प्राप्त गुणांच्या एकत्रित टक्केवारीच्या आधारे गुणवत्ता

यादी तयार करण्यात येईल.

परंतु, सारखीच टक्केवारी असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पध्दतीने ठरविण्यात येईल,-

(क) एचएससी परीक्षेतील एकत्रित गुणांची अधिकतम टक्केवारी;

(ख) एचएससी परीक्षेतील गणित विषयाच्या गुणांची अधिकतम टक्केवारी;

(ग) एसएससी परीक्षेतील एकत्रित गुणांची अधिकतम टक्केवारी.;

(घ) एसएससी परीक्षेतील गणित विषयाच्या अधिकतम टक्केवारीस प्राधान्य;

(ङ) इंटरमेडिएट श्रेणी चित्रकला परीक्षा उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्य.

**(घ) *प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र प्रवेशासाठी* ,**- गुणवत्ता यादी ही, एचएससी परीक्षेतील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र यामध्ये प्राप्त गुण आणि गणित किंवा जीवशास्त्र यापैकी अधिकतम असलेल्या विषयाचे गुण यांच्या एकत्रित टक्केवारीच्या आधारे तयार करण्यात येईल.

परंतु, सारखीच टक्केवारी असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पध्दतीने ठरविण्यात येईल,-

(क) एचएससी परीक्षेतील एकत्रित गुणांची अधिकतम टक्केवारी;

(ख) एचएससी परीक्षेतील भौतिकशास्त्र विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी;

(ग) एचएससी परीक्षेतील रसायनशास्त्र विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी;

(घ) एचएससी परीक्षेतील इंग्रजी विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी;

(ङ) एसएससी परीक्षेतील गुणांच्या अधिकतम टक्केवारीस प्राधान्य.

***(ङ) प्रथम वर्ष हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान,-*** एचएससी परीक्षेतील एकत्रित गुणांच्या टक्केवारीच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

परंतु, सारखीच टक्केवारी असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पध्दतीने ठरविण्यात येईल.

(क) एचएससी (विज्ञान) उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्य;

(ख) एचएससी (गृहविज्ञान) उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्य;

(ग) एचएससी (किमान क्षमतांवर आधारित असलेले व्यावसायिक पाठयक्रम) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास प्राधान्य;

(घ) एचएससी (वाणिज्य) उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्य;

(ङ) एचएससी (कला) उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्य.

## ९. केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप),-

(१) तांत्रिक पदविका शैक्षणिक संस्था, केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत (कॅप) उमेदवारांना प्रवेश देतील. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे (कॅप) टप्पे खाली नमूद केल्याप्रमाणे असतील,-

(क) सक्षम प्राधिकाऱ्याने माहिती पुस्तिका प्रदर्शित करणे किंवा प्रसिध्द करणे;

(ख) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी उमेदवाराने आवेदनपत्राचा नमुना ऑनलाईन पध्दतीने भरणे;

(एक) प्रथम वर्षाच्या अभियांत्रिकी/तंत्रज्ञान/औषधनिर्माणशास्त्र/एचएमसीटी मधील पदविका अभ्यासक्रमांकरिता आणि थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी/तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमांकरिता, अधिसूचित वेळापत्रकानुसार ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

(दोन) उमेदवार कोणत्याही सुविधा केंद्रावर अर्ज अंतिमतः कन्फर्म करण्यापूर्वी, सुविधा केंद्रावर त्याच्या अर्जामध्ये भरलेली माहिती बदलू/सुधारित करु शकतात.

(तीन) केवळ ऑनलाईन पद्धतीने उमेदवाराने भरावयाच्या ना -परतावा शुल्कांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| प्रवेशाचा प्रकार | महाराष्ट्र राज्यातील सर्वसाधारण प्रवर्ग, महाराष्ट्र राज्याबाहेरील (OMS), जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधून विस्थापित उमेदवार | राखीव प्रवर्ग उमेदवार [SC, ST, VJ/DT- NT(A), NT(B), NT(C), NT(D), OBC, SBC, EWS] & PWD फक्त महाराष्ट्र राज्यातील |
|---|---|---|
| प्रथम वर्ष दहावीनंतरचे अभियांत्रिकी/ तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम | रुपये ४००/- | रुपये ३००/- |
| प्रथम वर्ष बारावीनंतरचे औषधनिर्माणशास्त्र/ सरफेस कोटिंग तंत्रज्ञान/एचएमसीटी पदविका अभ्यासक्रम | रुपये ४००/- | रुपये ३००/- |
| थेट द्वितीय वर्ष दहावीनंतरचे अभियांत्रिकी/ तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम | रुपये ४००/- | रुपये ३००/- |

(ग) ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्राचा नमुना भरतांना प्रवेशास आवश्यक असलेल्या वैध प्रमाणपत्रांच्या मूळ प्रतीच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे;

(एक) ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवारांना प्रवेशाच्या आवश्यकतेनुसार वैध आवश्यक मूळ कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रतिमा अपलोड करणे आवश्यक आहे.

(दोन) उमेदवारांनी भरलेल्या माहितीची पडताळणी करुन घ्यावी व आवश्यक असल्यास सुधारणा कराव्यात. उमेदवाराने सादर केलेल्या अर्जाचा प्रिंटआउट घेऊन त्यावर सही करावी.

(तीन) अर्जाच्या प्रिंटआउटमध्ये उमेदवाराने अर्जात भरलेल्या दाव्याची पूर्तता करण्यासाठी सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी असेल. उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतींचा एक संच सोबत ठेवावा.

(घ) उमेदवाराने सुविधा केंद्रावरुन, या प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने विहित केलेल्या पद्धतीने, कागदपत्रांची पडताळणी करून घेणे. आवेदन पत्रात दावा केल्यानुसार दाव्याच्या समर्थनार्थ सर्व मूळ प्रमाणपत्र पडताळणी साठी सादर करणे उमेदवारास बंधनकारक असेल;

सक्षम प्राधिकाऱ्याने कागदपत्रे पडताळणीसाठी खालील पद्धती विहित केल्या आहेत.

सक्षम प्राधिकरण, कागदपत्रांच्या प्रत्यक्ष छाननी प्रक्रियेव्यतिरिक्त ई-स्क्रूटनीची संकल्पना राबविणार आहे. ऑनलाईन अर्ज भरणे व निश्चित करणे याकरिता उमेदवार त्यांच्या सोयीनुसार छाननीची पद्धत निवडू शकतील.

(एक) "ई-स्क्रूटनी" पद्धत:

- उमेदवार ऑनलाईन नोंदणी करून "ई-स्क्रूटनी" पद्धतीचा पर्याय निवडू शकतील.
- या पद्धतीमध्ये उमेदवार कोणत्याही ठिकाणाहून इंटरनेटशी जोडलेल्या कोणत्याही संगणकावरून/ मोबाईलवरून (स्मार्टफोन) ऑनलाईन अर्ज भरतील आणि सबमिट करतील व आवश्यक कागदपत्रे अपलोड करतील
- उमेदवाराला अर्जाच्या पडताळणीसाठी व निश्चितीसाठी कोठेही प्रत्यक्ष जाण्याची आवश्यकता नाही.
- ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर, उमेदवाराचा अर्ज व कागदपत्रे ई-स्क्रूटनी पद्धतीद्वारे नियुक्त केलेल्या सुविधा केंद्राद्वारे (एफसी द्वारे) पडताळले जातील व निश्चित केले जातील.
- उमेदवाराच्या अर्जाची एफसीकडून ई-स्क्रूटनीसाठी निवड होण्यापूर्वी, उमेदवार त्याच्या अर्जामध्ये दुरुस्ती करु शकतो. याबातची स्थिती उमेदवाराच्या लॉगिनमध्ये उपलब्ध असेल.
- एफसी येथे अर्जाची निश्चिती झाल्यानंतर उमेदवाराद्वारे अर्जामधील माहिती बदलता येणार नाही.
- कोणत्याही दुरुस्त्या असल्यास उमेदवार त्या बाबत तक्रार नोंदवू शकतो.

*अशा उमेदवारांच्या अर्जाची ई-स्क्रूटनी दरम्यान:*

- सादर केलेल्या अर्जामध्ये कोणतीही त्रुटी आढळली नाही तर:
  असे अर्ज ई-स्क्रूटनी पद्धतीद्वारे अर्जाची, अपलोड केलेले कागदपत्रांची पडताळणी करुन निश्चित केले जातील. अर्जांची पडताळणी व निश्चितीची स्थिती उमेदवारास त्याच्या लॉग इन मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच पोचपावतीदेखील उपलब्ध असेल.
- सादर केलेल्या अर्जामध्ये त्रुटी आढळली तर:
  उमेदवाराच्या लॉग इन मध्ये अर्ज परत पाठवून त्रुटींचे तपशील उमेदवारांना कळवून ते दुरुस्तीसाठी सूचित केले जाईल.
- उमेदवाराने परत पाठविण्यात आलेला अर्ज दुरुस्त करावा व ई-स्क्रूटनीसाठी उमेदवाराच्या लॉग इन द्वारे पुन्हा सबमिट करावा. उमेदवारासाठी ही प्रक्रिया अनिवार्य आहे. कोणत्याही दुरुस्ती / सवलतीच्या दाव्यासाठी (असल्यास) उमेदवार आवश्यक कागदपत्रे अपलोड करू शकतात.
- ई-स्क्रूटनी पध्दतीच्या वेळी, उमेदवार अर्जामध्ये केलेला दावा सिद्ध करण्यासाठी सुसंगत आणि वैध कागदपत्रे सादर करतील. संबंधित कागदपत्रे सादर न केल्यास, उमेदवार अर्जात केलेले असे दावे गमावतील आणि अशा दाव्यांचा विचार न करता अशा उमेदवारांच्या अर्जाची निश्चिती केली जाईल.

(दोन) "प्रत्यक्ष स्क्रूटनी" पध्दत:

- उमेदवार ऑनलाईन नोंदणी मोबाईल (स्मार्ट फोन) अथवा संगणकाद्वारे करून "प्रत्यक्ष स्क्रूटनी" पद्धतीचा पर्याय निवडू शकतील.
- अशा उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरणे, स्कॅन करुन आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आणि अर्ज पडताळणी करणे व निश्चित करणे अशा प्रक्रिया करण्याकरिता, आपल्या सोयीनुसार तारीख व वेळ

करावी.

- ज्या उमेदवारांकडे संगणक / स्कॅनिंग / इंटरनेट इत्यादी सुविधा नाहीत असे उमेदवार त्यांच्या सर्वात जवळील सुविधा केंद्रावर जाऊन ऑनलाईन नोंदणी व सोयीस्कर वेळ ठरवण्यासाठी जाऊ शकतील.
- उमेदवारांनी कोणत्याही सोयीस्कर सुविधाकेंद्रांवर मूळ कागदपत्रांसह अर्ज पडताळणीसाठी उपस्थित रहावे.
- सुविधा केंद्र प्रमुख आवश्यक कागदपत्रांच्या मूळ प्रतींमधील माहितीची पडताळणी करेल.
- सुविधा केंद्र प्रमुख ऑनलाइन प्रणालीद्वारे उमेदवाराच्या अर्जाच्या फॉर्मची पुष्टी (निश्चिती) करेल आणि अर्ज जमा केल्याची पोच-पावती देईल.
- प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीच्या वेळी, उमेदवार अर्जामध्ये केलेला दावा सिद्ध करण्यासाठी सुसंगत आणि वैध कागदपत्रे सादर करतील. संबंधित कागदपत्रे सादर न केल्यास, उमेदवार अर्जात केलेले असे दावे गमावतील आणि अशा दाव्यांचा विचार न करता अशा उमेदवारांच्या अर्जांची निश्चिती केली जाईल.
- सुविधाकेंद्रावर एकदा अर्ज कन्फर्म झाल्यानंतर, उमेदवारांला माहिती बदलता येणार नाही.
- उमेदवाराने कोणत्याही आवश्यक दुरुस्तीबद्दल, जेथे त्याने/तिने यापूर्वी अर्जाची निश्चिती केली होती त्याच सुविधा केंद्रात भेट द्यावी.

(ड.) तात्पुरत्या गुणवत्ता याद्या प्रदर्शित किंवा प्रकाशित करणे, तक्रारी असल्यास, या प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने विहित केलेल्या पद्धतीने, त्या दाखल करुन घेणे आणि अंतिम गुणवत्ता याद्या प्रदर्शित किंवा प्रसिध्द करणे;

तात्पुरती गुणवत्ता यादीच्या घोषणेनंतर, उमेदवार प्रदर्शित माहितीमध्ये काही दुरुस्त्याचा / सवलतीचा दावा करीत असल्यास, अशा सर्व प्रकारच्या उमेदवारांसाठी सक्षम प्राधिकरणाने तक्रार सादर करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे विहित केलेली आहे.

(एक) ई-स्क्रूटनी पध्दत निवडलेल्या उमेदवारांसाठी:

- उमेदवाराने त्याच्या/तिच्या लॉग-इनद्वारे प्रदर्शित झालेल्या तात्पुरत्या गुणवत्ता यादीमध्ये दर्शविलेल्या माहितीमध्ये आवश्यक दुरुस्तीबद्दल तक्रार नोंदवावी.
- अश्या उमेदवारांचे अर्ज त्यांच्या लॉग इन मध्ये दुरुस्तीसाठी परत पाठविण्यात येतील.
- कोणत्याही दुरुस्ती / सवलतीच्या दाव्यासाठी उमेदवार आवश्यक कागदपत्रे अपलोड करू शकतात. उमेदवारासाठी ही अनिवार्य प्रक्रिया आहे.
- उमेदवाराने नोंद केलेल्या तक्रारीची स्वीकृतीबाबतची/नाकारण्याबाबतची स्थिती तसेच अद्ययावत पोचपावती उमेदवारांना लॉगिनमध्ये उपलब्ध असेल.
- ई-स्क्रूटनी पध्दतीच्या वेळी, उमेदवार अर्जामध्ये केलेला दावा सिद्ध करण्यासाठी सुसंगत आणि वैध कागदपत्रे सादर करतील. संबंधित कागदपत्रे सादर न केल्यास, उमेदवार अर्जात केलेले असे दावे गमावतील आणि अशा दाव्यांचा विचार न करता अशा उमेदवारांच्या अर्जांची निश्चिती केली जाईल.
- नेमून दिलेल्या तारखांनंतर अर्जामध्ये केलेला दावा सिद्ध करण्यासाठी कोणतेही कागदपत्रे स्वीकारले जाणार नाही.

(दोन) प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत निवडलेल्या उमेदवारांसाठी:

- उमेदवाराने प्रदर्शित झालेल्या तात्पुरत्या गुणवत्ता यादीमध्ये दर्शविलेल्या माहितीमध्ये आवश्यक दुरुस्तीबद्दल, जेथे त्याने/तिने यापूर्वी अर्जाची निश्चिती केली होती त्याच सुविधा केंद्रात जाऊन तक्रार नोंदवावी.
- उमेदवार सुविधा केंद्रात कोणत्याही दुरुस्ती / सवलतीसाठी हक्क सांगण्यासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करू शकतात.
- सुविधा केंद्र (एफसी) उमेदवाराला नवीन पोच पावती देईल.
- प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दतीच्या वेळी, उमेदवार अर्जामध्ये केलेला दावा सिद्ध करण्यासाठी सुसंगत आणि वैध कागदपत्रे सादर करतील. संबंधित कागदपत्रे सादर न केल्यास, उमेदवार अर्जात केलेले असे दावे गमावतील आणि अशा दाव्यांचा विचार न करता अशा उमेदवारांच्या अर्जांची निश्चिती केली जाईल.
- नेमून दिलेल्या तारखांनंतर अर्जामध्ये केलेला दावा सिद्ध करण्यासाठी कोणतेही कागदपत्रे स्वीकारले जाणार नाही.

(तीन) अंतिम गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रदर्शित केली जाईल.

(चार) गुणवत्ता यादीमुळे उमेदवाराचे सापेक्ष स्थान कळते आणि ते कोणत्याही कोर्स / संस्थेत प्रवेश मिळाल्याची हमी देत नाही.

(च) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) फेरीनिहाय उपलब्ध असलेल्या प्रवर्गनिहाय जागा (जागांची रचना) प्रदर्शित करणे; सक्षम प्राधिकरण हे संस्था, अभ्यासक्रम, मंजूर प्रवेश क्षमता आणि प्रत्येक प्रवर्गासाठी प्रत्येक प्रवेशफेरींकरिता उपलब्ध असलेल्या जागांची माहिती वेबसाईटवर प्रकाशित करेल.

(छ) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) फेरीनिहाय पाठयक्रम व संस्था यांचा पसंतीक्रम असणारा ऑनलाइन विकल्प नमुना भरणे व त्यास पुष्टी देणे. उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या पसंतीने संस्था व पाठयक्रम याबाबतचे शक्य असतील असे जास्तीत जास्त पसंतीक्रम उतरत्या क्रमाने भरता येतील. उमेदवाराने विकल्प नमुन्यास पुष्टी दिल्यानंतर, तो विकल्प नमुना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फेरीनिहाय जागा वाटपासाठी विचारात घेण्यात येईल; कॅपमध्ये भाग घेण्यासाठी (संबंधित कॅपच्या पात्रतेच्या निकषांच्या पूर्ततेच्या अधीन राहून ) संबंधित कॅप फेरीसाठी ऑनलाईन विकल्प अर्ज भरणे अनिवार्य आहे.

(एक) उमेदवार त्यांच्या लॉगिनद्वारे ऑनलाइन विकल्प अर्ज भरू शकतील.

(दोन) सर्व उमेदवारांनी ऑनलाइन विकल्प अर्ज कन्फर्म करणे अनिवार्य आहे.

(तीन) विकल्प अर्ज एकदा कन्फर्म झाल्यानंतर, उमेदवार आपले पर्याय बदलू शकणार नाही.

(चार) तोतयागिरी टाळण्यासाठी उमेदवारांनी त्यांचा अर्जाचा आयडी आणि संकेतशब्द (पासवर्ड) इतरांना जाहीर करू नये. उमेदवाराच्या वतीने इतरांनी केलेल्या सबमिशनसाठी सक्षम प्राधिकरण जबाबदार राहणार नाही. सुरक्षेच्या कारणास्तव, उमेदवारांना संकेतशब्द (पासवर्ड) बदलत रहाण्याची आणि तिची नोंद सुरक्षित ठिकाणी ठेवण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

(पाच) विकल्प अर्जामधील ब्लॉकचा अनुक्रमांक निवड पसंती दर्शवते. अशा प्रकारे ब्लॉक क्रमांक १ मधील उमेदवाराने भरलेल्या संस्थेचा विकल्प प्रथम प्राधान्य (उच्चतम प्राथमिकता निवड) मानला जाईल.

(सहा) ऑनलाईन सबमिशनद्वारे प्राप्त केलेला विकल्प अर्जच पुढील प्रक्रियेसाठी विचारात घेतला जाईल.

(सात) उमेदवाराने अर्ज आयडी आणि संकेतशब्द (पासवर्ड) यांचा वापर करुन (टाइप करुन), ऑनलाईन विकल्प

अर्जाची पुष्टी करावी. उमेदवार त्याच्या रेकॉर्ड आणि भविष्यातील संदर्भासाठी पुष्टी केलेल्या विकल्प अर्जाची प्रिंटआउट घेऊ शकतो.

(आठ) उमेदवार कमीत कमी १ व जास्तीत जास्त ३०० विकल्प भरु शकतो. उमेदवाराने संस्थेचा विकल्प क्रमांक विकल्प अर्जामधील, विकल्पामध्ये नमुद करावा.

(ज) वाटप केलेली संस्था आणि पाठयक्रम दर्शविणारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) फेरीनिहाय तात्पुरते जागा वाटप प्रदर्शित करणे;

(झ) सक्षम प्राधिकाऱ्याने देऊ केलेली जागा स्वीकारण्याच्या आणि या नियमांच्या पोट-नियम (४) च्या खंड (ङ) नुसार, चुका दुरुस्त करण्याच्या प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने खालीलप्रमाणे विहित केलेल्या पध्दतीने घोषित केलेल्या वेळापत्रकानुसार उमेदवाराने प्रवेश उपस्थिती केंद्रावर हजर होऊन वाटप करण्यात आलेल्या जागेची स्वीकृती करणे;

- ज्या उमेदवाराला कॅपफेरी दरम्यान जागा वाटप केली गेली असेल त्यांनी **कागदपत्रांच्या पडताळणीसाठी आणि जागा स्वीकृतीसाठी एआरसीकडे आवश्यकता नाही.**
- जागावाटप झाल्यानंतर, उमेदवारांनी त्याला/तिला कॅपफेरीदरम्यान दिलेले जागा वाटप हे नियमांनुसार आहे किंवा नाही याची पडताळणी स्वत: करावी.
- उमेदवारांनी त्याच्या/ तिच्या लॉगिनमधून पात्रता गुण, प्रवर्ग, लिंग, आरक्षण, स्वत: हून केलेले स्वत: चे विशेष आरक्षण यासंबंधीचे त्याने/तिने केलेले दावे बरोबर आहेत याची खात्री करुन घ्यावी. तसेच त्याने/तिने दाखल केलेले दावे योग्य व बरोबर असल्याबाबतचे सुसंगत कागदपत्रे अपलोड केलेले आहेत याची खात्री करावी. जागावाटपाची अचूकता सुनिश्चित केल्यावर, उमेदवाराने दिलेली जागा स्वीकारण्याच्या उद्देशाने जागा स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरले पाहिजे.
- जागावाटपाच्या स्वयं पडताळणी दरम्यान जर उमेदवारांला, उमेदवारी अर्जाच्या नमुन्यात केलेल्या दाव्याच्या आधारे केलेले जागावाटप व त्याने केलेला दावा योग्य नाही असे आढळून आले आणि त्याला त्याची चूक दुरुस्त करायची असल्यास (या नियमांच्या पोट-नियम (४) च्या खंड (ङ) नुसार, चुका दुरुस्त करण्याचे प्रयोजन), उमेदवाराने ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे तक्रार/हरकत नोंदवावी.
- नंतरच्या टप्प्यात, उमेदवाराने अर्जात केलेल्या खोट्या दाव्यांवरून उमेदवाराला जागावाटप झालेले आहे असे आढळल्यास, असे जागावाटप/जागावाटप केलेल्या संस्थेत घेतलेला प्रवेश आपोआप रद्द होईल.

(त्र) सक्षम प्राधिकाऱ्याने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) विविध टप्प्यांसाठी विहित केलेले वेळापत्रक पालन करणे बंधनकारक असेल.

**(२) *केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची (कॅप) पहिली फेरी आयोजित करणे,-*** पहिल्या प्रवेश फेरी करिता उपलब्ध जागा संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येतील. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) अंतिम गुणवत्ता यादीत ज्या उमेदवारांचे नाव आहेत असे उमेदवार ऑनलाईन विकल्प नमुना भरून या फेरीत सहभाग घेण्यास पात्र असतील. उमेदवार त्यांच्या लॉग-इन मधून विकल्प नमुना भरून त्यास पुष्टी देतील.

(३) ***केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान (कॅप):***

(क) जर उमेदवारास त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या पसंतीक्रमांकावरील जागेचे वाटप झाल्यास असे वाटप प्रणालीतून आपोआप गोठविले जाईल व उमेदवार या जागेचा स्वीकार करेल. असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेरींमध्ये सहभागी होण्यास पात्र नसतील. असे उमेदवार वरील कलम ९ (१) (झ) मध्ये दिलेल्या सूचनांचे अनुसरण करतील. तदनंतर असे उमेदवार वाटप करण्यात आलेल्या जागेवर प्रवेश घेण्यासाठी वाटप करण्यात आलेल्या संस्थेमध्ये हजर होतील. अशा उमेदवाराने कलम ९ (१) (झ) मध्ये दिलेल्या सूचनांचे अनुसरण केले नाही तर ते त्यांना वाटप करण्यात आलेल्या जागेवरील हक्क आपोआप गमावतील आणि ती जागा पुढील वाटपासाठी उपलब्ध होईल. अशा उमेदवारांकरिता करण्यात आलेले हे जागावाटप अंतिम असेल;

(ख) ज्या उमेदवारास त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकावरील जागेचे वाटप झाल्यास आणि उमेदवार या वाटपाने संतुष्ट असल्यास आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेरींमध्ये सहभागी होण्याची त्याची इच्छा नसल्यास उमेदवार त्याच्या लॉग-इन मधून त्यास देऊ केलेली जागा स्वतः गोठवू शकतो. असे उमेदवार वरील कलम ९(१) (झ) मध्ये दिलेल्या सूचनांचे अनुसरण करतील. तदनंतर असे उमेदवार वाटप करण्यात आलेल्या जागेवर प्रवेश घेण्यासाठी वाटप करण्यात आलेल्या संस्थेमध्ये हजर होतील. अशा उमेदवाराने कलम ९(१) (झ) मध्ये दिलेल्या सूचनांचे अनुसरण केले नाही तर ते त्यांना वाटप करण्यात आलेल्या जागेवरील हक्क आपोआप गमावतील आणि ती जागा पुढील वाटपासाठी उपलब्ध होईल. अशा उमेदवारांकरिता करण्यात आलेले हे जागावाटप अंतिम असेल व असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेरींमध्ये सहभागी होण्यास पात्र नसतील;

(ग) ज्या उमेदवारांना त्याच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकावरील जागेचे वाटप झाले आणि दिलेले जागावाटप वरील कलम ९(१) (झ) मध्ये दिलेल्या सूचनांनुसार स्वीकारले नाही तर असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेरींमध्ये वरच्या पसंतीक्रमावरील जागा मिळविण्याकरिता सहभागी होण्यास पात्र असतील.

(घ) ज्या उमेदवारांना त्यांच्या विकल्प नमुन्यातील पहिल्या पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकावरील जागेचे वाटप झाले आणि उमेदवाराने प्रवेश उपस्थिती केंद्रावर हजर न होवून जागास्वीकृती केली नाही, असे उमेदवार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पुढील फेरींमध्ये सहभागी होण्यास पात्र असतील.

***(४) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची (कॅप) दुसरी आणि तिसरी फेरी आयोजित करणे,-***

(क) दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीकरिता उपलब्ध जागा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीकरिता पात्र उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने विकल्प नमुना भरण्यास किंवा पूर्वी भरलेल्या विकल्प नमुन्यामध्ये बदल करण्यास मुभा देण्यात येईल. या फेरींदरम्यान वाटप करावयाच्या जागा खाली दिल्या प्रमाणे पात्र उमेदवारांना उपलब्ध असतील,-

(एक) वरीलप्रमाणे उपनियम ३(ग) व ३(घ) नुसार उमेदवार;

(दोन) पूर्वीच्या कोणत्याही फेरीत कोणतीही जागावाटप न झालेले उमेदवार;

(तीन) पूर्वीच्या प्रवेशफेरीत सहभागी झाले नाही (विकल्प नमुना भरला नाही) असे उमेदवार;

(ख) ज्या उमेदवारांना पहिल्या पसंतीक्रमांकाखेरीज इतर पसंतीक्रमांकावरील जागेचे वाटप झाले आणि वरील कलम ९(१)(झ) मध्ये दिलेल्या सूचनांचे अनुसरण कले तर अशा उमेदवारांनी नविन विकल्प नमुना भरतांना त्यांना पूर्वीच्या फेरीमध्ये वाटप झालेला विकल्प त्यांच्या पसंतीक्रमाच्या यादीत नमूद करणार नाहीत, संगणकीय प्रणालीद्वारे तो विकल्प यादीच्या शेवटी समाविष्ट करण्यात येईल. जर वरच्या पसंतीक्रमानुसार नवीन जागेचे वाटप करण्यात आले की अगोदर करण्यात आलेले वाटप आपोआप रदद होईल. वरच्या पसंतीक्रमानुसार नवीन जागेचे वाटप न झाल्यास पूर्वीच्या फेरीमधील वाटप अबाधित राहील;

(ग) उमेदवारास तिसऱ्या प्रवेशफेरी नंतर वरच्या पसंतीक्रमावरील जागेच्या वाटपाची संधी नसेल. तिसऱ्या प्रवेश फेरीमध्ये सहभागी झालेल्या उमेदवारांना तिसऱ्या फेरीत करण्यात आलेले वाटप किंवा पूर्वीचे अबाधित ठेवण्यात आलेले वाटप हे अंतिम वाटप असेल;

(घ) उमेदवार संस्थेत प्रवेश घेण्यासाठी हजर होण्याच्या वेळेस, अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ सर्व मूळ प्रमाणपत्र सादर करेल. जर उमेदवाराला अर्जा मध्ये केलेल्या केलेल्या दाव्याच्या आधारे जागा वाटप केले गेले असेल आणि अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ मूळ प्रमाणपत्र सादर करण्यात अपयशी ठरले तर जागावाटप आपोआप रद्द होईल व ती जागा पुढील फेरीमध्ये वाटपासाठी उपलब्ध होईल;
परंतु, उमेदवाराला अर्जात केलेल्या कोणत्याही दाव्याचा लाभ न घेता, जागा वाटप झाले असेल तर अशा परिस्थितीत उमेदवाराचे जागा वाटप अबाधित ठेवण्यात येईल. तथापि, नियम ९, पोट-नियम (४) च्या खंड (ङ) मधील तरतुदीनुसार, उमेदवारास अर्जामधील त्रुटी सुधारण्यासाठी परवानगी देण्यात येईल.

(ङ) उमेदवारास प्रवेश अर्जातील खाली दिलेल्या चुका तक्रार/हरकत नोंदवून दुरुस्त करून घेण्याची मुभा असेल जसे,-

(एक) लिंगातील बदल पुरुष ते स्त्री व त्याउलट;

(दोन)परीक्षेतील, गुण भरतांना केलेली चूक, तथापि गुणांतील वाढीमुळे गुणवत्ता क्रमांकात होणारा बदल करण्यास परवानगी नसेल;

(तिन)मागासवर्गीय प्रवार्गामधील जात, पोटजात भरतांना झालेली चूक. परंतु कोणत्याही प्रकरणी सामान्य प्रवर्गातील उमेदवारास मागासवर्गीय प्रवर्गात बदल करता येणार नाही. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवार प्रकरणपरत्वे आवश्यक प्रमाणपत्रांची जसे,जात/जमात प्रमाणपत्र, जात/जमात वैधता प्रमाणपत्र, उन्नतप्रवर्गात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र इत्यादी, पूर्तता करू न शकल्यास त्यास सामान्य प्रवर्गात बदल करता येईल;

(चार) आधारभूत कागदपत्र सादर न करू शकल्या मुळे अल्पसंख्यांक दर्जा काढून टाकणे;

(पाच) आधारभूत कागदपत्र सादर न करू शकल्या मुळे दिव्यांग दर्जा काढून टाकणे;

(सहा) आधारभूत कागदपत्र सादर न करू शकल्या मुळे डिफेन्स दर्जा काढून टाकणे;

(सात) उमेदवारी प्रकारातील बदल;

(आठ) जिल्हा बदल;

(नऊ) आधारभूत कागदपत्र सादर न करू शकल्या मुळे शिक्षणशुल्क माफी अंतर्गत जागा मिळण्यासाठीच्या पात्रतेचा दर्जा काढून टाकणे;

(दहा) आधारभूत कागदपत्र सादर न करू शकल्या मुळे व्यावसाईक/तांत्रिक दर्जा काढून टाकणे;

(अकरा) शैक्षणिक अर्हता बदल.

वरिल व्यतिरिक्त इतर कोणत्याही बाबतीत बदल किंवा दुरुस्ती करण्यास परवानगी नाही.

५) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) अंतिम फेरीनंतर, उमेदवार त्यास वाटप केलेल्या संस्थेमध्ये विहित वेळापत्रकानुसार उपस्थित राहील व त्या संस्थेतील आपला प्रवेश कायम करील. संस्था आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करेल व उमेदवाराचा प्रवेश ऑनलाईन प्रणालीत संस्थेच्या लॉगइन मधून ताबडतोब अपलोड करेल व उमेदवारास प्रवेशाच्या पुष्टीसाठी ऑनलाईन प्रणालीतून मिळणारी पावती व शुल्क भरल्याची पावती देईल.

१०. **केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) वाटपाचे टप्पे आणि पद्धती ,-** केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत (कॅपअंतर्गत) येणाऱ्या जागांचे वाटप पुढील पद्धतीनुसार करण्यात येईल:- .

(१) **महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणारे उमेदवार,-**(क) संगणकीकृत पद्धतीने जागा वाटपाचे टप्पे पुढील प्रमाणे आहेत,-

**टप्पा एक :- सर्व उमेदवारांसाठी,-**

(क) विविध प्रवर्गातील सर्व उमेदवारांचा (तांत्रिक, अतांत्रिक, खुला, राखीव, पुरुष, महिला) त्यांच्या परस्पर गुणवत्तेनुसार जागा वाटपाकरिता विचार करण्यात येईल;

(ख) आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील (इडब्ल्यूएस) आणि अनाथ उमेदवारांना त्यांच्या परस्पर गुणवत्तेनुसार त्यांच्यासाठी आरक्षित असलेल्या जागांसाठी विचार करण्यात येईल, जर त्यांच्यासाठी आरक्षित असलेल्या जागा उपलब्ध नसतील तर त्यांना त्यांच्या परस्पर गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील जागांसाठी विचारात घेतले जाईल;

(ग) मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांचा, त्यांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातील, जागांसाठी विचार करण्यात येईल, जर त्यांच्या गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील जागा उपलब्ध होत नसतील तर त्यांच्या संबंधित राखीव प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार केला जाईल;

(घ) विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांचा, त्यांच्या गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार केला जाईल आणि अशा जागा उपलब्ध होत नसतील तर असे उमेदवार त्यांचा विशेष मागासवर्ग प्रवर्गामध्ये समावेश होण्यापूर्वी ते ज्या मागास प्रवर्गामध्ये होते अशा त्या मूळ मागासवर्ग प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार करण्यात येईल;

(ङ.) दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांना जागांचे वाटप

(एक) दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांना जागांचे वाटप, केवळ त्यांच्या संबंधित आरक्षित किंवा सर्वसाधारण प्रवर्गामध्येच करण्यात येईल;

(दोन) दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांकरिता उपलब्ध जागांची संख्या, त्या पाठ्यक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये उपलब्ध जागांनुसार विनिर्दिष्ट पाठ्यक्रमाच्या एकूण संख्येमध्ये नमूद करण्यात येईल;

(तीन) जर दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांच्या जागा, त्यांच्या संबंधित आरक्षित किंवा सर्वसाधारण प्रवर्गातील विहित आरक्षणाच्या टक्केवारीनुसार पूर्णांकात येत असतील तरच (अपूर्णांक संख्या पूर्णांकात रूपांतरित करण्यास परवानगी नाही) केवळ अशा जागा, दिव्यांग व्यक्तींच्या त्या विशिष्ट आरक्षित किंवा

सर्वसाधारण प्रवर्गाकरिता आरक्षित म्हणून राखीव ठेवण्यात येतील आणि त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार वाटप करण्यात येतील;

(चार) त्या पाठ्यक्रमासाठी, दिव्यांग व्यक्ती प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी उपलब्ध असलेल्या इतर सर्व जागा (राखून ठेवलेल्या जागांखेरीज), दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील सर्व उमेदवारांच्या संयुक्त यादीतील त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार वाटप करण्यात येतील:

परंतु, त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार त्याच राखीव प्रवर्गातून एकापेक्षा अधिक जागा भरण्यात येणार नाही:

परंतु आणखी असे की, वरील परंतुकाच्या तरतुदीमुळे जागा वाटपासाठी विचार न झालेल्या उमेदवारांचा, त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार, सर्वसाधारण दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील जागांचे वाटप करण्यासाठी विचार करण्यात येईल.

(पाच) दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवाराच्या जागांचे वाटप केल्यानंतर, त्या सर्वसाधारण किंवा संबंधित मागास वर्ग प्रवर्गातील व दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील जागा, उपयोगात आणल्याचे समजण्यात येईल.

(सहा) जर कोणत्याही पाठ्यक्रमाच्या जागांच्या सारणीमध्ये, राखीव किंवा सर्वसाधारण प्रवर्गासाठी उपलब्ध असलेल्या एकूण जागा, दोनपेक्षा कमी असतील तर, अशा बाबतीत, दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारास, कोणतीही जागा वाटप करण्यात येणार नाही.

(च) संरक्षण संरक्षण दल प्रवर्गातील उमेदवारांना जागांचे वाटप

(एक) संरक्षण दल प्रवर्गातील उमेदवारांना जागांचे वाटप, केवळ त्यांच्या संबंधित आरक्षित किंवा सर्वसाधारण प्रवर्गामध्येच करण्यात येईल;

(दोन) संरक्षण दल प्रवर्गातील उमेदवारांकरिता उपलब्ध जागांची संख्या, त्या पाठ्यक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये उपलब्ध जागांनुसार विनिर्दिष्ट पाठ्यक्रमाच्या एकूण संख्येमध्ये नमूद करण्यात येईल;

(तीन) जर संरक्षण दल प्रवर्गातील उमेदवारांच्या जागा, त्यांच्या संबंधित आरक्षित किंवा सर्वसाधारण प्रवर्गातील विहित आरक्षणाच्या टक्केवारीनुसार पूर्णांकात येत असतील तरच (अपूर्णांक संख्या पूर्णांकात रूपांतरित करण्यास परवानगी नाही) केवळ अशा जागा, संरक्षण दलाच्या त्या विशिष्ट आरक्षित किंवा सर्वसाधारण प्रवर्गाकरिता आरक्षित म्हणून राखीव ठेवण्यात येतील आणि त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार वाटप करण्यात येतील;

(चार) त्या पाठ्यक्रमासाठी, संरक्षण दल प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी उपलब्ध असलेल्या इतर सर्व जागा (राखून ठेवलेल्या जागांखेरीज), संरक्षण दल प्रवर्गातील सर्व उमेदवारांच्या संयुक्त यादीतील त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार वाटप करण्यात येतील:

परंतु, त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार त्याच राखीव प्रवर्गातून एकापेक्षा अधिक जागा भरण्यात येणार नाही:

परंतु आणखी असे की, वरील परंतुकाच्या तरतुदीमुळे जागा वाटपासाठी विचार न झालेल्या उमेदवारांचा, त्यांच्या परस्परांतील गुणवत्तेनुसार, संरक्षण दल प्रवर्गाच्या सर्वसाधारण जागांमधील जागांचे वाटप करण्यासाठी विचार करण्यात येईल.

(पाच) संरक्षण दल प्रवर्गातील उमेदवाराच्या जागांचे वाटप केल्यानंतर, त्या सर्वसाधारण किंवा संबंधित मागास वर्ग प्रवर्गातील व संरक्षण दल प्रवर्गातील जागा, उपयोगात आणल्याचे समजण्यात येईल.

(सहा) जर कोणत्याही पाठ्यक्रमाच्या जागांच्या सारणीमध्ये, राखीव किंवा सर्वसाधारण प्रवर्गासाठी उपलब्ध असलेल्या एकूण जागा, दोनपेक्षा कमी असतील तर, अशा बाबतीत, संरक्षण दल प्रवर्गातील उमेदवारास, कोणतीही जागा वाटप करण्यात येणार नाही.

(छ) अर्हता परीक्षेत तांत्रिक किंवा व्यावसायिक विषय असणाऱ्या उमेवाराना जागांचे वाटप करतेवेळी त्यांची उपलब्धता खालीलप्रमाणे तपासण्यात येईल.-

(एक) खुल्या प्रवर्गात तांत्रिक विषय असलेल्या उमेदवारासाठी असणाऱ्या जागा;

(दोन) संबंधित राखीव प्रवर्गात तांत्रिक विषय असलेल्या उमेदवारासाठी असणाऱ्या जागा;

(तीन) खुल्या प्रवर्गात सर्व साधारण उमेदवारांसाठी असणाऱ्या (तांत्रिक आणि तांत्रिकेतर दोहोकारिता) जागा;

(चार) संबंधित राखीव प्रवर्गात सर्व साधारण उमेदवारांसाठी असणाऱ्या (तांत्रिक आणि तांत्रिकेतर दोहोकारिता) जागा.

(त्र) जर एखाद्या उमेदवारास एकापेक्षा जास्त वर्गवारीमध्ये वाटपासाठी जागा उपलब्ध असल्यास त्याचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात येईल,-

(एक) महिला उमेदवारासाठीची जागा

(दोन) दिव्यांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारासाठीची जागा

(तीन) संरक्षण प्रवर्गातील उमेदवारासाठीची जागा

**टप्पा-दोन : महिलांसाठी राखीव असलेल्या जागांचे पुरुष उमेदवारांना वाटप,-**मागासवर्ग प्रवर्गातील किंवा खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना जागांचे वाटप झाल्यानंतर, जर जागा रिक्त राहिल्या तर रिक्त राहिलेल्या जागांचे वाटप संबंधित मागासवर्गातील किंवा खुल्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांना करण्यात येईल.

**टप्पा-तीन : विशेष मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांकरिता,-**जर इतर मागासवर्ग प्रवर्गातील जागा रिक्त राहिल्या तर अशा जागांच्या कमाल २ टक्के इतक्या मर्यादेपर्यंत विशेष मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांना अशा जागांचे वाटप करण्यात येईल.

**टप्पा-चार : सर्व उमेदवारांसाठी (कोणत्याही प्रकारचे आरक्षण वगळून),-**

(एक) सर्व पात्र उमेदवारांना परस्पर गुणवत्तेच्या आधारे वाटप करण्याकरिता या जागांचा विचार करण्यात येईल;

**टप्पा-पाच: सर्व उमेदवारासाठी (कोणत्याही प्रकारचे उमेदवारी प्रकार वगळून)-** (क) रिक्त जागांच्या वाटपासाठी पात्र असलेल्या सर्व उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

(ख)महिला उमेदवारांसाठी राखीव जागांचे वाटपाची पध्दत शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र.आरएसव्ही १०१२/CN-१६/१२/१६ए, दि.१३ ऑगस्ट २०१४ मध्ये दिल्यानुसार असेल.

**(२) अल्पसंख्यांक कोट्यातील जागा.-** संगणकीकृत जागा वाटपाचे टप्पे खालील प्रमाणे असतील,

**टप्पा-एक:** संस्था ज्या अल्पसंख्याक भाषिक किंवा धार्मिक समाजाकरीता आहे त्या समाजातील, राज्याच्या उमेदवारांना गुणवत्तेच्या आधारे अल्पसंख्याकासाठीच्या राखीव जागांचे वाटप करण्यात येईल.

**टप्पा दोन:** जर जागा शिल्लक राहिल्या तर अशा जागांचे वाटप महाराष्ट्र राज्य उमेदवारी उमेदवाराना परस्पर गुणवत्तेच्या आधारे करण्यात येईल.

**(३) जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधून विस्थापित उमेदवारी असणारे उमेदवार,-** जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधून विस्थापित उमेदवारी असणारे उमेदवारासाठी उपलब्ध असलेल्या अधिसंख्य जागांचे वाटप या नियमाच्या नियम ५(६) अनुसार पात्र उमेदवारांना त्यांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे वाटप करण्यात येईल.

## ११. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅपच्या) पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीव्दारे जागाचे वाटप करणे.-

(१) कॅपच्या सर्व (पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या) फेरीमध्ये संगणकीय प्रणाली वापरून जागाचे वाटप करण्यात येईल;

(२) कॅपच्या पहिल्या फेरीमध्ये.-

(क) अल्पसंख्यांक संस्थासाठी,- जागांचे वाटप खाली दिलेल्या पद्धतीने व प्राधान्यक्रमाने करण्यात येईल,

(एक) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (२) मधील टप्पा -१,

(दोन) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (१) मधील टप्पा -१ आणि टप्पा -२ टेक्निकलसह व नॉनटेक्निकलसह,

(तीन) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (१) मधील टप्पा -१ आणि टप्पा -२ टेक्निकलशिवाय व नॉनटेक्निकलशिवाय

(ख) अल्पसंख्यांकेतर संस्थांसाठी, जागांचे वाटप खालील प्राधान्यक्रमाने करण्यात येईल.

(एक) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (१) मधील टप्पा-१ आणि टप्पा-२ टेक्निकलसह व नॉनटेक्निकलसह

(दोन) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (१) मधील टप्पा-१ आणि टप्पा-२ टेक्निकलशिवाय व नॉनटेक्निकलशिवाय

(३) कॅपच्या दुसऱ्या फेरीमध्ये.-

(क) अल्पसंख्यांक संस्थासाठी,- जागांचे वाटप खाली दिलेल्या पद्धतीने व प्राधान्यक्रमाने करण्यात येईल,

(एक) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (२ ) मधील टप्पा -१,

(दोन) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (१) मधील टप्पा -१ ते टप्पा -५ टेक्निकलसह व नॉनटेक्निकलसह,

(तीन) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (१) मधील टप्पा -१ ते टप्पा -५ टेक्निकलशिवाय व नॉनटेक्निकलशिवाय,

(चार) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (२ ) मधील टप्पा -२,

(ख) अल्पसंख्यांकेतर संस्थांसाठी, जागांचे वाटप खालील प्राधान्यक्रमाने करण्यात येईल.

(एक) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (१) मधील टप्पा-१ ते टप्पा-५ टेक्निकलसह व नॉनटेक्निकलसह

(दोन) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (१) मधील टप्पा-१ ते टप्पा-५ टेक्निकलशिवाय व नॉनटेक्निकलशिवाय

(४) कॅपच्या तिसऱ्या फेरीमध्ये.-

(क) अल्पसंख्यांक संस्थासाठी,- जागांचे वाटप खाली दिलेल्या पद्धतीने व प्राधान्यक्रमाने करण्यात येईल,

(एक) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (२ ) मधील टप्पा -१,

(दोन) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (१) मधील टप्पा -१ ते टप्पा -५ टेक्निकलसह व नॉनटेक्निकलसह,

(तीन) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (१) मधील टप्पा -१ ते टप्पा -५ टेक्निकलशिवाय व नॉनटेक्निकलशिवाय,

(चार) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (२ ) मधील टप्पा -२,

(ख) अल्पसंख्यांकेतर संस्थांसाठी, जागांचे वाटप खालील प्राधान्यक्रमाने करण्यात येईल.

(एक) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (१) मधील टप्पा-१ ते टप्पा-५ टेक्निकलसह व नॉनटेक्निकलसह

(दोन) या नियमाच्या नियम १० मधील पोटनियम (१) मधील टप्पा-१ ते टप्पा-५ टेक्निकलशिवाय व नॉनटेक्निकलशिवाय

(५) जागा वाटप न होणे किंवा उमेदवार प्रवेशासाठी उपस्थित न राहणे, यामुळे जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागाचे त्यापुढील फेरीमध्ये वाटप करण्यात येईल;

(६) कॅपच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीमधील प्रत्येक टप्प्यावरील जागांचे वाटप सुरुवातीला मूळ जिल्हा/ मूळ जिल्ह्याबाहेरील असा फरक करून व त्यानंतर जागा रिक्त राहिल्यास मूळ जिल्हा /मूळ जिल्ह्याबाहेरील असा फरक वगळून करण्यात येईल व त्यानंतरही कोणत्याही कारणास्तव नियम *७(१)* व *७(२)* मधील जागा रिक्त राहिल्यास किंवा झाल्यास अशा सर्व जागा नियम *५(१)* मधील उमेदवारी असलेल्या उमेदवारांना त्यांच्यामध्ये कोणताही फरक न करता परस्पर गुणवत्तेच्या आधारे करण्यात येतील;

## १२. सर्वसाधारण सूचना,-

(क) कॅपच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेऱ्यांमधील मूळ जिल्हा जागांचे, मूळ जिल्ह्याबाहेरील जागांचे आणि राज्यस्तरीय जागांचे वाटप, महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेल्या उमेदवारांच्या परस्पर गुणवत्तेनुसार केले जाईल. उमेदवारांना परस्पर गुणवत्ता, त्यांनी भरलेले विकल्प आणि कॅपच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेऱ्यांच्या संबंधित टप्प्यामध्ये त्यावेळी उपलब्ध असलेल्या जागा, यानुसार जागांचे वाटप केले जाईल;

(ख) जागा वाटपाच्या विशिष्ट टप्प्यासाठी पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांचा, जरी त्यांना अगोदरच्या टप्प्यामध्ये जागा वाटप करण्यात आलेले असेल किंवा नसेल तरी, त्या टप्प्यामध्ये जागा वाटपासाठी विचार केला जाईल.;

(ग) कोणत्याही टप्प्याच्या जागा वाटपादरम्यान, त्यावेळी असणाऱ्या जागांच्या उपलब्धतेप्रमाणे उमेदवाराने भरलेल्या

विकल्पानुसार, त्याचा जागावाटपातील क्रम वर सरकत राहील;

(घ) तांत्रिक पदविका शैक्षणिक संस्थामध्ये या नियमाच्या नियम ७(२), ७(३) आणि ७(४) मध्ये नमूद केलेल्या जागांच्या वाटपासाठी विविध प्रवर्गाअंतर्गत कोणत्याही प्रकारचे आरक्षण असणार नाही.

(ड) सर्व राखीव प्रवर्गातील उमेदवारांचा (विशेष मागासप्रवर्ग उमेदवाराचा त्यांच्या मूळ प्रवर्गामध्ये) त्यांच्यासाठी राखीव जागावर सर्व टप्प्यामध्ये परस्पर गुणवत्तेच्या आधारे जागा वाटपासाठी विचार केला जाईल.

(च) क्रम वर सरकल्यामुळे, रिक्त होणाऱ्या जागांचा, त्या टप्प्याच्या जागा वाटपाच्या तरतुदीनुसार त्याच टप्प्यावरील पुढील प्रक्रियेमध्ये जागा वाटप करण्याकरिता विचार करण्यात येईल;

(छ) भरण्यात आलेल्या पसंतीक्रमामधील पहिल्या उपलब्ध विकल्पानुसार करण्यात आलेले वाटप हे अंतिम जागा वाटप म्हणून अबाधित ठेवण्यात येईल;

(ज) संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेल्या जागा वाटपाच्या यादीमध्ये, उमेदवारांना देऊ करण्यात आलेल्या तात्पुरत्या जागांचे वाटप दर्शविण्यात येईल. या संदर्भात उमेदवारांशी व्यक्तिश: कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना जागावाटप पत्रे पाठविली जाणार नाहीत;

(झ) ज्या उमेदवारास जागेचे वाटप करण्यात आले असेल तो उमेदवार “तात्पुरते जागावाटप पत्र” संकेतस्थळावरुन त्याच्या लॉग इन मधून डाऊनलोड करुन घेईल आणि माहितीपुस्तीकेतील नियम क्र ९(१) (झ) व ९(३) यांचे काळजीपूर्वक वाचन करून जागा-स्वीकृती शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरतिल;

(त्र) प्रवेशित सर्व उमेदवारांसाठी जागा-स्वीकृती शुल्क, रु.१,०००/- एवढे असेल. हे शुल्क ना-परतावा प्रक्रिया शुल्क असेल;

(ट) कलम ९(१) (झ) मध्ये दिलेल्या सूचनांनुसार जागावाटपाचा स्वीकार करण्यास अपयशी झाल्यास उमेदवाराने देऊ केलेली जागा नाकारली असल्याचे समजण्यात येईल;

(ठ) जर कोणतीही कागदपत्रे किंवा प्रमाणपत्रे विधिअग्राहय किंवा खोटी असल्याचे कोणत्याही वेळी आढळून आले आणि / किंवा उमेदवाराने पात्रता निकषांची पूर्तता केली नाही तर वाटप करण्यात आलेली जागा कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल;

(ड) ज्या उमेदवारांना वाटप करण्यात आलेली जागा नाकारावयाची असेल त्यांना स्वीकृती शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. वाटप केलेली जागा नाकारणाऱ्या उमेदवारांना उर्वरित प्रवेश फेऱ्यामध्ये भाग घेण्यासाठी वेळापत्रकानुसार नवीन विकल्प अर्ज सदर करावा लागेल.

(ढ) जर आवेदनपत्र मध्ये उमेदवाराने त्याच्या प्रवेशाच्या संबंधात पुरवलेली कोणतीही माहिती नंतर कोणत्याही वेळी चुकीची आढळली तर त्याचा प्रवेश रद्द केला जाईल, शुल्क जप्त केले जाईल आणि त्याला प्राचार्य संस्थेतून काढून टाकू शकतील. अश्या निष्कासन आदेशाविरुद्ध सक्षम प्राधिकारयास ७ दिवसांच्या आत अपील केले जाऊ शकते, अशा प्रकरणांमध्ये सक्षम प्राधिकारयाचा निर्णय अंतिम असेल.

(ण) खोट्या प्रमाणपत्रांच्या वापरासंदर्भातील तक्रारींची तपासणी ठराविक कालावधी मध्ये करण्यात यावी व दोषी आढळल्यास असा प्रवेश रद्द करण्यात यावा. तसेच पुढील कार्यवाही सक्षम प्राधिकारयास कळवून करण्यात यावी.

१३. **संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्याक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागावर प्रवेश,-** विनाअनुदानित संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य, या जागांवरील प्रवेश प्रक्रिया खालील पद्धतीचा वापर करून पार पाडतील,-

(क) उपलब्ध जागांवर प्रवेश हे पारदर्शक रीतीने व ज्यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी व नंतर संस्थेकडे प्रवेशासाठी आवेदनपत्र सादर केलेले आहे अशा सर्व उमेदवारांच्या परस्पर गुणवत्तेनुसार करण्यात येतील;

(ख) प्रवेशप्रक्रिया सुरू करण्यापूर्वी पुरेसा वेळ मिळेल अशा रीतीने संस्थेची माहिती व प्रवेशाचे नियम विनिर्दिष्ट केलेले असतील अशी पुस्तिका किंवा निर्देशपुस्तिका प्रकाशित करण्यात यावी. माहिती पुस्तिकेमधील सर्व माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर देखील प्रदर्शित करण्यात यावी;

(ग) प्रत्येक संस्था प्रवेशाचे वेळापत्रक आणि संस्थेकडून प्रत्येक पाठयक्रमातील भरावयाच्या एकूण जागांची संख्या यांची जाहिरात संस्थेच्या संकेतस्थळावर प्रकाशित करतील व आवेदनपत्र मागवतील;

(घ) प्रवेशासाठी वेळोवेळी शासनाने अधिसूचित केलेले व समुचित प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करणारे इच्छुक उमेदवार हे संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य यांच्याकडे संस्था स्तरावरील प्रवेशासाठी नियम ७(५)(ख) मध्ये तरतूद केल्यानुसार आवेदनपत्र सादर करतील व या जागा ते या नियमांच्या नियम ८(३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती अनुसरून तयार करण्यात आलेल्या परस्पर गुणवत्ता यादीतील गुणानुक्रमे भरतील;

(ङ) संस्था आवश्यक सर्व कागदपत्रांची पडताळणी करून, संस्थास्तरावर संस्थास्तरीय कोटयातील जागा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागा, भारताचे समुद्रपार नागरिक/भारतीय वंशाच्या व्यक्ती / विदेशी विद्यार्थी /आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले या अधिसंख्य कोट्यातून प्रवेश द्यावयाच्या उमेदवारांची गुणवत्ता यादी (याद्या) संस्थेच्या सूचनाफलकावर व संकेतस्थळावरसुद्धा प्रसिध्द करील;

(च) विनिर्दिष्ट केलेल्या पाठयक्रमांच्या संस्थास्तरीय कोट्यातील जागा (अंशत: किंवा पूर्णत:) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेला परत करण्याचा उद्देश असणाऱ्या अल्पसंख्याक किंवा अल्पसंख्याकेतर संस्था, केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीतील जागेची रचना प्रदर्शित करण्यापूर्वी दोन दिवस अगोदर तसे कळवतील आणि त्या जागांचे, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या नियमांनुसार वाटप करण्यात येईल. तदनंतर संस्थास्तरीय कोट्यातील जागा प्रत्यार्पित करण्याची मुभा संस्थांना नसेल;

(छ) घेतलेल्या आणि रद्द केलेल्या सर्व प्रवेशाबाबतची माहिती संगणकीय (ऑनलाईन) प्रणालीमार्फत तात्काळ संस्था अद्ययावत करतील;

(ज) जर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्या पार पडल्यानंतर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची जागा रिक्त राहिल्यास किंवा झाल्यास ती जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान ज्या प्रवर्गाकरीता राखून ठेवलेली होती, त्याप्रवर्गाच्या उमेदवारामधूनच भरण्यात येईल. तदनंतरही जागा रिक्त राहिल्यास, त्या जागा अर्जदाराच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे भरण्यात येतील.

(झ) या जागा भरताना परस्परांतील गुणवत्तेच्या आधारे, अखिल भारतीय उमेदवारांपेक्षा महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

(त्र) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेला महाराष्ट्र राज्य उमेदवार व अखिल भारतीय उमेदवारी असलेला उमेदवार यांचा समावेश केल्यानंतर, जर मंजूर प्रवेश क्षमतेतील कोणतीही जागा रिक्त राहात असेल तर, या जागा, या जागा भरण्यासाठी समुचित प्राधिकरणाकडून मान्यता असण्याच्या अधीन राहून, अनिवासी भारतीय (एनआरआय), विदेशी नागरिक विद्यार्थी (एफएन), भारताचे समुद्रपार नागरिक (ओसीआय), भारतीय वंशाच्या व्यक्ती (पीआयओ) व आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले (सीआयडब्ल्यूजीसी) ही उमेदवारी असलेल्या उमेदवारांमधून भरता येतील.

## १४. गुणवत्ता यादी व प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीस मान्यता ,-

(१) प्रवेशप्रक्रिया संपल्यानंतर, सर्व तांत्रिक पदविका शिक्षण संस्था, सक्षम प्राधिकारी यांचेकडे प्रवेश मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करतील.

(२) प्रवेश मान्यतेसाठीच्या प्रस्तावामध्ये संस्थास्तरावर प्रवेश देण्यात आलेल्या व कोटा असलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांची यादी, उमेदवारीचा प्रकार, आरक्षण, अर्हता इत्यादी तसेच संस्था स्तरावर प्रवेश दिलेल्या उमेदवारांच्या प्रवेशासाठीच्या आवश्यक कागदपत्रांचा समावेश असेल.

(३) जर एखाद्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेने लागोपाठच्या तीन वर्षाच्या कालावधीत तिच्या मंजूर प्रवेश क्षमतेच्या किमान एकावन्न टक्के प्रवेश संबंधित अल्पसंख्यांक प्रवर्गातील व्यक्तींमधून देण्यात कसूर केली तर, सक्षम प्राधिकारी, त्याबाबतची माहिती विभागास कळवतील, विभागाकडून अशा संस्थाबाबतची माहिती व निरीक्षण अल्पसंख्यांक विकास विभाग यांना अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था अधिनियम २००४ च्या राष्ट्रीय आयोगाच्या कलम १२ सी च्या तरतुदीनुसार अग्रेषित करेल.

## १५. प्रवेश रद्द करणे व शुल्काचा परतावा ,संस्थेद्वारे कागदपत्र परत देणे,-

(क) उमेदवार प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करील आणि प्रवेश रद्द करण्यासाठी असलेल्या प्रणाली निर्मित अर्जाची स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर करील. उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने विनंती सादर केल्यानंतर उमेदवाराचा प्रवेश रद्द झाला असे समजण्यात येईल. उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी असलेल्या प्रणाली निर्मित अर्जाची स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर केली किवा नाही या बाबत काहीही असले तरी संस्था, उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने सादर केलेली विनंती अंतिम मानेल. अशा प्रकारे जागा रद्द झाल्याने उमेदवार त्या जागेवरील हक्क गमावेल व ती जागा पुढील वाटपासाठी उपलब्ध होईल. तदनंतर उमेदवार शुल्क परताव्याचा दावा करू शकेल व प्रणाली निर्मित अर्जाची स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर केल्याच्या दोन दिवसाच्या आत संस्था प्रक्रिया शुल्क म्हणून रुपये १००० वजा करून शुल्क परतावा आणि उमेदवारास सर्व मूळ प्रमाणपत्रे परत करेल;

(ख) वरील (क) मध्ये नमूद असले तरीही, जर सक्षम प्राधिकाऱ्याने निर्धारित केलेल्या प्रवेशाच्या अंतिम दिनांकास संध्याकाळी ५ वाजल्या नंतर प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज केला असल्यास उमेदवार सावधता ठेव व्यतिरिक्त शुल्क परताव्यास पात्र असणार नाही;

(ग) कोणतीही संस्था, ज्यांच्याकडे उमेदवारांनी त्यांची प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे त्या संस्थेमध्ये प्रवेशासाठी जमा केलेली असतील, व जर उमेदवार अशा संस्थेमध्ये अभ्यासक्रम पुढे चालू ठेवण्यासाठी किंवा त्या संस्थेतील सुविधा घेण्यासाठी इच्छुक नसतील अशा प्रसंगी जमा करण्यात आलेली प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे उमेदवारास परत करण्यास कोणत्याही प्रकारे विरोध करणार नाहीत किंवा त्यासाठी अशा अभ्यासक्रमाचे किंवा इतर कोणतेही शुल्क अदा करण्यासाठी त्याच्यावर दबाव टाकणार नाहीत. अशा प्रकरणात शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार कारवाई केली जाईल;

(घ) विद्यार्थ्यांने कोणत्याही वेळी प्रवेश रद्द केल्यानंतर संस्थने पुढील वर्षांचे शुल्क मागू नये.

१६. **पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षानंतर पाठयक्रम किंवा संस्था बदलणे,-** १) प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर म्हणजेच प्रथम व द्वितीय सत्र उत्तीर्ण असलेले किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण असलेले, पाठयक्रम किंवा पाळी बदलण्याची विनंती करणाऱ्या उमेदवाराला, जागांच्या उपलब्धतेच्या अधीन राहून त्याच संस्थेत तसे बदल करण्याची मुभा देण्यात येईल आणि हे बदल प्रथम वर्षाच्या/प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे करण्यात येतील. उमेदवार जो पाठयक्रम बदलून घेणार आहे त्या पाठयक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने निर्धारित केल्याप्रमाणे उमेदवारांच्या पात्रतेची सुनिश्चिती करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांची असेल.

(२) उमेदवारांचे एक किंवा दोन वर्षानंतर पाठयक्रम आणि/किंवा संस्था बदल खालील प्रमाणे करण्यात येतील,-

(क) प्रथम / द्वितीय वर्षात एकदा प्रवेश घेतलेला उमेदवार त्याच शैक्षणिक वर्षात इतर कोणतीही संस्था बदलून मागण्यास पात्र असणार नाही;

(ख) प्रथम वर्षाच्या परीक्षेमध्ये (प्रथम व व्दितीय या दोन्ही सत्रांच्या) / द्वितीय वर्षाच्या परीक्षेमध्ये (तृतीय व चतुर्थ सत्राच्या) सर्व विषयांमध्ये उत्तीर्ण असणारा किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेल्या विषयांपैकी एका विषयशीर्षात अनुत्तीर्ण असलेला उमेदवार तसेच द्वितीय वर्षातील बदलासाठी प्रथम वर्षात उत्तीर्ण उमेदवारास संस्था किंवा पाठयक्रम बदलून घेण्यास पात्र असेल;

(ग) विद्यार्थ्यांना विद्यमान संस्थेमधून दुसऱ्या कोणत्याही संस्थेमध्ये बदलून जाण्याची तरतूद अनूसुचि-५ मध्ये नमूद करण्यात आलेली आहे;

(घ) विनाअनुदानित संस्थांमध्ये बदलून जाणे:- विनाअनुदानित संस्थांचे प्राचार्य हे, तंत्र शिक्षण संचालनालयाच्या पूर्व मान्यतेने, संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे पात्रता प्रमाणपत्र व रिक्त जागांबाबतची स्थिती सादर केल्यावर, बदल करुन घेण्याच्या मागणीसाठी इतर संस्थामधील उमेदवारांचा विचार करतील. उमेदवार जो पाठयक्रम बदलून घेत आहे त्या पाठयक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने निर्धारित केल्याप्रमाणे उमेदवारांच्या पात्रतेची सुनिश्चिती संस्थेचे प्राचार्य किंवा संचालक करतील;

(ङ) संस्थेच्या प्राचार्यांच्या शिफारशी शिवाय तंत्र शिक्षण संचालनालयाकडून कोणताही अर्ज दाखल करुन घेतला जाणार नाही;

(च) जर बदल करून घेण्याच्या प्रक्रियेपूर्वी एखाद्या संस्थेचा किंवा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचा निकाल घोषित झाला नसेल तर, त्या मंडळाचे किंवा संस्थेचे उमेदवार बदल करून घेण्याबाबतच्या मागणीपासून वंचित राहतील.

(३) पाठ्यक्रम किंवा संस्था बदलण्यासाठी पात्रता निकष पूर्ण न करणारे उमदेवार कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही संस्थेत स्थलांतरित केले जाणार नाहीत.

(४) अधिसंख्य कोटयातील जागे अंतर्गत प्रवेश देण्यात आलेले उमेदवार हे पाठयक्रम किंवा संस्था बदलण्यासाठी पात्र असणार नाहीत.

(५) या अधिसुचनेच्या अंतर्गत समाविष्ट नसलेल्या तांत्रिक पदविका संस्थामधील उमेदवार, या अधिसूचने अंतर्गत समाविष्ट तांत्रिक पदविका संस्थेमध्ये संस्था व अभ्यासक्रम बदलासाठी, शासनाने वेळोवेळी नमूद केलेल्या पात्रतेच्या अटी, शर्ती व निकष आणि वरील (२) मधील नियमांच्या पूर्ततेच्या अधीन राहून पात्र असतील.

(६) वरील प्रमाणे केलेले सर्व शाखा बदल व संस्था बदल संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांना अंतिम मान्यतेकरीता कळवतील.

## १७. शुल्क आणि सवलती-

१७.१ शासकीय आणि अशासकीय अनुदानित संस्थांसाठी निर्धारित शुल्क

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी शुल्काची रचना खालीलप्रमाणे असेल

| शुल्क | पोस्ट एसएससी पदविका अभ्यासक्रमांचे प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षाचे प्रवेश<br><br>स्वायत्त आणि स्वायत्त नसलेल्या शासकीय संस्था आणि अ-शासकीय अनुदानित संस्था | पोस्ट एचएससी पदविका अभ्यासक्रमांचे पहिले वर्ष<br><br>स्वायत्त आणि स्वायत्त नसलेल्या शासकीय संस्था आणि अ-शासकीय अनुदानित संस्था |
|---|---|---|
| शिक्षण शुल्क | रु. ६,०००/- प्रति वर्ष | रु.६,०००/- प्रति वर्ष |
| डेव्हलपमेंट शुल्क | रु.१,०००/- प्रति वर्ष | रु.३,०००/- प्रति वर्ष |
| इतर शुल्क | रु.५५०/- प्रति वर्ष | रु. ५५०/- प्रति वर्ष |
| एकूण | रु.७५५०/- प्रति वर्ष | रु.९५५०/- प्रति वर्ष |
| सावधता ठेवी (परत करण्यायोग्य) | रु. २००/ - सावधता ठेव म्हणून दर वर्षी न भरता फक्त एकदाच भरायचे आहे. | |

- रबर टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम - स्वयंअर्थसहाय्यित असलेला हा अभ्यासक्रम शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई येथे सुरु आहे. हा अभ्यासक्रम विनाअनुदानित अभ्यासक्रम म्हणून गणला जाईल आणि खासगी विना अनुदानित तंत्रनिकेतनाबाबतीत शुल्क घेण्याचे नियम या अभ्यासक्रमाला लागू असतील.

- SC/ST/VJ/DTNT(A)/NT(B)/NT(C)/NT(D)/SBC प्रवर्गातील उमेदवारांसाठी आणि TFWS अंतर्गत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांसाठी शिक्षण शुल्क लागू नाही. OBC प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी ५०% शिक्षण शुल्क लागू असेल.

१७.२ विनाअनुदानित खासगी संस्थांसाठी निर्धारित शुल्क

अ. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी

शुल्क नियामक प्राधिकरणाद्वारे मंजूर केल्याप्रमाणे विनाअनुदानित खासगी संस्थांची अंतरिम शुल्काची रचना असेल. शुल्क नियामक प्राधिकरणाद्वारे मंजूर आणि प्रकाशित केलेली अंतिम शुल्क त्या शैक्षणिक वर्षासाठी त्या अभ्यासक्रमासाठी उमेदवारास देय शुल्क असेल.

ब. राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी (फक्त महाराष्ट्र राज्यातील)

(SC / ST / VJ DT NT(A) / NT(B) / NT(C) / NT(D) / SBC / OBC प्रवर्गातील उमेदवार)

SC/ST/VJ/DTNT(A)/NT(B)/NT(C)/NT(D)/SBC प्रवर्गातील उमेदवारांसाठी आणि TFWS अंतर्गत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांसाठी शिक्षण शुल्क लागू नाही. OBC प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी ५०% शिक्षण शुल्क लागू असेल.

**महत्वाचे मुद्दे**

१. शिक्षण शुल्क व इतर शुल्क संबंधीत पात्र उमेदवारांसाठी सवलतीची पध्दत, कर्ज शिष्यवृत्तीची योजना (लागू असल्यास) केंद्र / राज्य शासनाद्वारे घोषित करण्यात येईल. संबंधित विभागांनी घालून दिलेले विविध निकष व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून, या उमेदवारांना वेळोवेळी शासन विभागाने जारी केलेल्या परिपत्रकात अधिसूचित केल्याप्रमाणेच नमूद माफीची रक्कम मिळेल. विविध संवर्गांमधे शुल्क सवलतीचा दावा करणारे उमेदवारांना संबंधित शासकीय विभागांनी विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे आवश्यक प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

२. EWS उमेदवारांसाठी शुल्काची रचना वेळोवेळी जाहीर करण्यात आलेल्या शासनाच्या धेय्य धोरणानुसार असेल.

३. सन २०२३-२४ च्या शासकीय संस्थांच्या शुल्कामध्ये शासनाने बदल केल्यास, प्रवेश मिळालेल्या उमेदवारांना शासनाच्या आदेशानुसार शुल्कामधील फरक भरावा लागेल.

४. संबंधित सामाजिक न्याय / आदिवासी कल्याण प्राधिकरणाने दावा नाकारल्यास किंवा मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवार त्याच्या / तिच्या प्रवर्गाच्या संदर्भात कागदपत्रांसह शुल्क भरपाईसाठी दावा सिद्ध करण्यास अपयशी ठरला असेल तर विहित शुल्क प्रवेशित संस्थेमध्ये भरण्याची जबाबदारी उमदेवारांची असेल.

५. उमेदवार अकरावी व/किंवा बारावी उत्तीर्ण/अनुतीर्ण झाल्यानंतर प्रथम वर्ष दहावीनंतरचा पदविका अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेत असेल आणि जितके वर्ष शुल्क सवलत यापूर्वी घेतलेली असेल तर अशा उमेदवारांनी संपूर्ण शिक्षण शुल्क, डेव्हलोपमेंट शुल्क आणि इतर शुल्क, तितक्या वर्षांकरिता भरणे आवश्यक असेल.

६. राखीव प्रवर्गाअंतर्गत शुल्क सवलतीत दावा करणारे उमेदवारांना जात/जमाती प्रमाणपत्र, जात/जमाती वैधता प्रमाणपत्र (संबंधित विभागांच्या आवश्यकतेनुसार) सादर करणे आवश्यक राहील. OBC, SBC, VJ/ DT(A), NT-B, NT-C and NT-D प्रवर्गाअंतर्गत फी सवलतीत दावा करणारे उमेदवारांना ३१ मार्च २०२४ पर्यंत वैध असलेले नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७. वसतिगृहांमध्ये राहणार असल्यास वसतिगृह शुल्क, विमा शुल्क आणि संबंधित संस्थेमध्ये लागू असलेले इतर शुल्क, उमेदवारांकडून संस्थास्तरावरून आकारण्यात येईल.

८. शुल्कामध्ये काही बदल असल्यास अशा बदलांची सूचना नंतर दिली जाईल आणि उमेदवारांना बंधनकारक असेल. वरीलप्रमाणे शुल्क भरल्यानंतरच प्रवेशाची पुष्टी होईल.

१७.३ आखाती देशांमधील अनिवासी भारतीय / ओसीआय / पीआयओ / विदेशी विद्यार्थी / भारतीय कामगारांच्या मुलांसाठी शुल्क

१. शिक्षण शुल्क-

अ- बांगलादेश व पाकिस्तान वगळता सार्क देशांच्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक US $ २०००

आ- इतरांकरिता वार्षिक US $ ३०००

२. इतर शुल्क- वार्षिक US $ २०००

१७.४ जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र स्थलांतरित उमेदवार (J&K and Ladakh Migrant) आणि भारत सरकारच्या पुरस्कृत (GoI Nominee) उमेदवारांसाठी शुल्क

१. जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील स्थलांतरित उमेदवारांनी ज्या ठिकाणी त्यांनी प्रवेश मिळविला आहे तेथे शासकीय संस्थांच्या शुल्काप्रमाणेच शुल्क भरावे.

२. भारत सरकारच्या पुरस्कृत उमेदवारांनी ज्या ठिकाणी त्यांनी प्रवेश मिळविला आहे तेथे शासकीय संस्थांच्या शुल्काप्रमाणेच शुल्क भरावे.

१७.५ सावधता ठेवी

विद्यार्थ्यांकडून मिळालेली सावधता रक्कम ठेव पाठ्यक्रम यशस्वी झाल्यानंतर किंवा प्रवेश रद्द केल्यावर परत केली जाईल. कोणतीही वसुली होत नाही तोपर्यंत सावधता रक्कमेच्या ठेवीवर कोणतीही कपात केली जाणार नाही.

## १८. विविध तरतुदी

१८.१ आचरण आणि शिस्त

१. अर्जाच्या नमुन्यात उमेदवाराचे पूर्ण व अचूक विधान करण्यात अयशस्वी होणे आणि / किंवा कोणतीही माहिती दडपल्यामुळे आणि / किंवा खोटी कागदपत्रे सादर केल्याने उमेदवारास नंतरच्या प्रवेश प्रक्रियेदरम्यानच्या टप्प्यावर अपात्र ठरविले जाईल आणि अशा उमेदवारांस संपूर्ण निवड प्रक्रियेपासून वगळण्यात येईल.

२. कोणताही अन्यायकारक मार्ग अवलंबल्यास किंवा परीक्षेत गैरप्रकार केल्यास उमेदवाराला "महाराष्ट्र प्रिव्हेंशन मालप्रॅक्टिस ॲक्ट, युनिव्हर्सिटीज, बोर्ड आणि इतर विशिष्ट परीक्षा कायदा १९८२" अंतर्गत शिक्षेस पात्र ठरवले जाईल आणि त्याला परीक्षेसाठी अपात्र ठरविलेले जाईल.

३. येथे-वर नमूद न केल्या गेलेल्या कोणत्याही समस्या, जेव्हा केव्हा उद्भवतील तेव्हा पूर्णपणे अंतिमतः सक्षम प्राधिकार्यांद्वारे हाताळल्या जातील.

४. या नियमांमधील कोणतीही नियमांबाबत, शासनाने प्रवेशासंदर्भात कोणताही धोरणात्मक निर्णय घेतल्यास, असे निर्णय त्या-त्या वेळी शासनाच्या निर्देशानुसार अंमलात आणले जातील.

५. कोणत्याही महाविद्यालयात शिकत असलेले विद्यार्थी जर शासनाने लागू केलेल्या कायदे व कायद्यांच्या तरतुदींच्या विरोधात किंवा शिस्तीच्या नियमांच्या विरूद्ध कोणत्याही क्रियाकलापात देशविरोधी कार्यात गुंतलेले आढळले तर त्यांना कोणतीही सूचना न देता महाविद्यालयाच्या प्राचार्यांद्वारे, महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.

१८.२ रॅगिंगविरोधात कारवाई

महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग अधिनियम १९९९ व प्रिव्हेंनशन आणि प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग (एआयसीटीई अप्रूव्हल प्रोसेस हँडबुक २०२३-२४ मध्ये प्रकाशित परिशिष्ट १२) आणि त्यांचे वेळोवेळी प्रकाशित केल्या जाणाऱ्या दुरुस्ती. महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग अधिनियम १९९९, १५ मे, १९९९ पासून पासून लागू आहे आणि यामध्ये रॅगिंगविरूद्ध कारवाईची पुढील तरतुदी आहेत.

१. कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या आत किंवा बाहेर रॅगिंग करण्यास मनाई आहे.

२. जो कोणी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या आत किंवा बाहेरील रॅगिंगमध्ये भाग घेतो, सहभाग घेईल, किंवा प्रचार करेल तो दोषी ठरल्यास त्याला दोन वर्षांपर्यंत आणि / किंवा दंडाची शिक्षा होऊ शकते, ज्याची मुदत दहा हजार रुपये असू शकते.

३. रॅगिंगच्या गुन्ह्यात दोषी ठरविलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला शैक्षणिक संस्थेमधून काढून टाकले जाईल आणि अशा विद्यार्थ्याला अशा बर्खास्त होण्याच्या आदेशाच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीत इतर कोणत्याही शैक्षणिक संस्थेत प्रवेश दिला जाणार नाही.

४. जेव्हा कोणताही विद्यार्थी किंवा अशा प्रकरणी पालक किंवा एखाद्या शैक्षणिक संस्थेचे शिक्षक, शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखांकडे रॅगिंगची लेखी तक्रार करतात, तेव्हा शैक्षणिक संस्थेचा प्रमुख, कोणताही पूर्वग्रह न ठेवता तक्रार मिळाल्याच्या सात दिवसांच्या आत, तक्रारीत नमूद केलेल्या प्रकरणाची चौकशी करतील. आणि जर चौकशीमध्ये हे सत्य आढळले असेल तर, ज्या अशा दोषी विद्यार्थ्याला निलंबित करतील आणि पुढील कार्यवाहीसाठी शैक्षणिक संस्था ज्या भागात आहे त्या क्षेत्राचा कार्यक्षेत्र असलेल्या पोलिस ठाण्याकडे त्वरित तक्रार पाठवतील. शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखांनी चौकशी केली असता, आढळून आलेल्या तक्रारीत कोणतेही तथ्य आढळून आले नसल्यास संस्थेचा प्रमुख, तक्रारकर्त्यास लेखी स्वरूपात सत्य सांगेल. शैक्षणिक संस्था प्रमुखांचा निर्णय अंतिम असेल.

५. जर रॅगिंगची तक्रार नोंदविली जाते तेव्हा शैक्षणिक संस्था प्रमुख वरच्या कलम “४” मध्ये निर्दिष्ट केलेल्या पद्धतीने कार्य करण्यास अपयशी ठरल्यास किंवा दुर्लक्ष केल्यास अशा व्यक्तीस हा गुन्हा सिद्ध झाल्याचे समजले जाईल आणि दोषी ठरल्यास वरील विभाग “२” नुसार शिक्षा होईल.

६. उमेदवाराला संस्थेत प्रवेश देताना उमेदवाराकडून प्रतिज्ञापत्र घेणे आवश्यक आहे.

७. कोणतेही अधिनियम किंवा त्यातील दुरुस्ती जे एआयसीटीई, शासन किंवा मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय यांचे न्यायाधीशांकडून वेळोवेळी प्रकाशित केल्या जाऊ शकतात, या तरतुदी सदर प्रवेश नियमांतर्गत उमेदवार आणि संस्थांना लागू राहतील.

८. उमेदवारी अर्जाच्या नमुन्यात दिलेली कोणतीही माहिती किंवा पुरविलेली कोणतीही माहिती किंवा उमेदवाराने तिच्या प्रवेशासंदर्भात सादर केलेले कोणतेही प्रमाणपत्रे नंतर केव्हाही चुकीचे किंवा चुकीचे असल्याचे आढळल्यास, असा प्रवेश रद्द केला जाईल, फी जप्त केली जाईल किंवा त्याला किंवा तिला प्राचार्य /संचालकाद्वारे महाविद्यालयातून काढून टाकले जाईल. तथापि, हकालपट्टीच्या आदेशाविरूद्ध अपील ७ दिवसांच्या आत तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पाठविले जाऊ शकते, ज्यांचा अशा प्रकारणांवरील निर्णय अंतिम असेल. असे उमेदवार कायद्यातील तरतुदींनुसार दंडात्मक कारवाई करण्यासदेखील पात्र आहेत.

१८.३ इतर

१. पदविका पाठ्यक्रमांच्या शिक्षणाचे माध्यम इंग्रजी आहे.

२. एमएसबीटीईच्या प्रचलित पात्रतेच्या निकषांनुसार उमेदवारांनी पाठ्यक्रमात प्रवेश घेण्यासाठी पात्र असल्याची खात्री करण्याचा उमेदवारांना सल्ला देण्यात येत आहे.

३. शारीरिक तंदुरुस्ती: आपल्या स्वत:च्या निर्णयावर अवलंबून संस्थेचा प्रमुख कोणत्याही उमेदवाराला पाठ्यक्रमाची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी योग्य शारीरिक वैद्यकीय अधिकाऱ्यांचा संदर्भ घेऊ शकतो. पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी वैद्यकीय प्राधिकरणाचा अहवाल तंत्रशिक्षण संचालनालयाचे विभागीय कार्यालय, यांच्याकडे सादर केला जाईल.

४. महाविद्यालय / संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी संस्थेच्या प्रमुखांना योग्य पोलिस-प्राधिकरणाद्वारे उमेदवाराच्या पूर्वचारित्र्याची पडताळणी करून उमेदवाराच्या आचरण आणि चारित्र्याबद्दल स्वतःला संतुष्ट करण्याचा अधिकार आहे.

१८.४ वसतिगृह

प्रवेशित सर्वच उमेदवारांना वसतिगृहात राहण्याची सोय असू शकत नाही. उमेदवारांना वसतिगृह, वसतिगृहाचे शुल्क इ. बद्दलची माहिती, उमेदवार ज्या ठिकाणी प्रवेश घेण्यास इच्छुक आहेत तेथील महाविद्यालयाचे संचालक/प्राचार्यांकडून स्वतः पडताळणी करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. महाविद्यालयांचे संचालक/प्राचार्य वसतिगृह निवासस्थानासाठी दिव्यांग उमेदवार, जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील विस्थापित उमेदवार व भारत सरकारचे नामनिर्देशित उमेदवार यांच्या अर्जावर प्राधान्याने विचार करतील.

१८.५ महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या अधिसूचित नियमांच्या इंग्रजी आवृत्तीचा, प्रवेश नियमात केलेल्या कोणत्याही तरतुदींचा अर्थ आणि त्यांची शुद्धता, त्यातील दुरुस्ती व माहितीपुस्तिकेचा अर्थ लावण्यासाठी विचार केला जाईल.

## अनुसूची - एक
## (एसएससी नंतरच्या पदविका पाठ्यक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाकरिता)
### (नियम ६ व ७ पहा)

क(१). पदविका अभ्यासक्रमासाठी शासकीय, अशासकीय अनुदानित तांत्रिक पदविका संस्थांतील जागांचे वाटप

| अ.क्र | संस्थेचा प्रकार | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील जागांची संख्या - मंजूर प्रवेशक्षमतेच्या टक्केवारीप्रमाणे (अनिवासी भारतीय (एनआरआय) वगळून) | | |
|---|---|---|---|---|
| | | मूळ जिल्ह्यातील जागा (एचडी) | मूळ जिल्ह्याबाहेरील (ओएचडी) जागा | अल्पसंख्याका-साठीच्या जागा |
| १ | सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित संस्था (स्वायत्त संस्था सह परंतु अल्पसंख्याकासाठीच्या संस्था वगळून) | ७० टक्के# | ३० टक्के# | निरंक |
| २ | शासकीय , अशासकीय अनुदानित अल्पसंख्याकासाठीच्या संस्था संस्था (स्वायत्त संस्था सह) | ३५ टक्के | १५ टक्के | ५० टक्के |
| ३ | शासकीय संस्था (अल्पसंख्याकासाठीच्या तुकडीतील संस्था) ¥ | २१ टक्के | ९ टक्के | ७० टक्के |

ह्या जागा केवळ महाराष्ट्र राज्य उमेदवारांसाठी उपलब्ध आहेत.
**#** - डीडी. दारुवाला मेमोरियल स्कॉलरशिप ट्रस्टसाठी एक जागा वगळता वालचंद कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, सांगली (डिप्लोमा विंग) मध्ये उपलब्ध आहे. हि जागा संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या कोणत्याही पाठ्यक्रमाला दिली जाऊ शकते.
¥ -१३ सप्टेंबर २०११ रोजीचा शासन निर्णय क्र टीइडी -२०१० / (३३४/२०१०) / टीई -५ पहा.
टीप :-सक्षम प्राधिकरणाकडील १५% जागा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी निर्देशित केलेल्या तांत्रिक / व्यावसायिक विषयासह एसएससी परीक्षा पास करणाऱ्या विध्यार्थ्यांसाठी आरक्षित आहेत.
विशिष्ट अभ्यासक्रमांच्या बाबतीत, जागेचे वाटप राज्यस्तरीय गुणवत्तेनुसार करण्यात येईल.

क (२) . पदविका अभ्यासक्रमासाठी विनाअनुदानित खाजगी तांत्रिक पदविका संस्थांतील जागांचे वाटप

| अ.क्र. | संस्थेचा प्रकार | जागांची संख्या - मंजूर प्रवेशक्षमतेच्या टक्केवारीप्रमाणे | | |
|---|---|---|---|---|
| | | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया जागा | | संस्थास्तरीय जागा (अनिवासी भारतीयांसाठी ५ टक्के कोट्यासह, लागू असेल तर) |
| | | महाराष्ट्र राज्यातील उमेदवार | अल्पसंख्याक समाजासाठी जागा | |
| १ | विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (अल्पसंख्याकासाठी च्या संस्था वगळून ) | मूळ जिल्ह्यासाठी: तंत्र विषयासाठी ८.४ टक्के व अतांत्रिक साठी ४७.६ टक्के आणि मूळ जिल्ह्याबाहेरील इतर जिल्ह्यासाठी: तंत्र विषयासाठी ३.६ टक्के व अतांत्रिक साठी २०.४ टक्के | निरंक | २० टक्के |
| २ | विना अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था | मूळ जिल्ह्यासाठी* महाराष्ट्र राज्यातील जागांपैकी$ ७० टक्के (तंत्र विषयासाठी १०.५ टक्के व अतांत्रिक साठी ५९.५ टक्के) , मूळ जिल्ह्याबाहेरील इतर जिल्ह्यासाठी* महाराष्ट्र राज्यातील$ जागांपैकी ३० टक्के (तंत्र विषयासाठी ४.५ टक्के व अतांत्रिक साठी २५.५ टक्के) | किमान ५१ टक्के @ | २० टक्के |

कॅप जागा = मंजूर प्रवेशसंख्या - संस्थास्तरीय जागा (कोटा)

$महाराष्ट्र राज्यातील जागा = केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील जागा - अल्पसंख्यांक उमेदवारासाठीच्या जागा )

% टक्केवारी

* संस्थास्तरावरील जागा व अल्पसंख्यांक उमेदवारांसाठीचा कोटा वगळता या जागा महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेल्या व अखिल भारतीय उमेदवारी असलेल्या उमेदवारांमधून निर्धारित प्रमाणामध्ये भरण्यात येतील.

@अल्पसंख्यांक संस्था कमीत कमी टक्के जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून (अल्पसंख्यांक समुदायाच्या उमेदवारांमधून) भरेल. हि संख्या कमाल १०० टक्के असू शकेल. तथापि प्रत्येक अल्पसंख्यांक संस्था केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी, त्यांच्या संस्थेतील अल्पसंख्यांक कोट्यातून भरावयाच्या जास्तीत जास्त टक्के (जागा) घोषित करतील आणि सक्षम प्राधीकाऱ्याला कळवतील.

**एनआरआय उमेदवारांची प्रवेश प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे**

- संस्था स्तरावर योग्य प्राधिकरणाने मंजूर केल्यास, एनआरआय उमेदवारांकडून जास्तीत जास्त ५% जागा भरल्या जाऊ शकतात.
- या अनिवासी भारतीय कोट्यासाठी राखीव जागा रिक्त राहिल्यास, त्या रिक्त जागा अखिल भारतीय उमेदवाराच्या पात्र उमेदवारांकडून संस्थेद्वारे भरल्या जाऊ शकतात.
- परंतु या रिक्त जागा भरताना परस्पर गुणवत्तेच्या आधारे महाराष्ट्र राज्य उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.
- या जागा उमेदवारांकडून परस्पर गुणवत्तेच्या आधारे संस्थेद्वारे भरल्या जातील. परस्पर गुणवत्तेची प्रक्रिया या माहितीपत्रकाच्या नियम ८ मध्ये दिलेली आहे.
- एनआरआय कोट्या अंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणा एनआरआय उमेदवारांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया, चालू शैक्षणिक वर्षात संबंधित संस्थांना या कोटासाठी एआयसीटीईकडून मान्यता मिळेल या अटींच्या अधीन राहून असेल.
- या तरतुदीअंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार ऑनलाईन पद्धतीने (क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड / नेट बँकिंग) अर्ज फी भरून ऑनलाईन अर्ज भरतील, त्यानंतर अर्जाची प्रिंटआउट घेणे, स्कॅन केलेल्या आवश्यक कागदपत्रांची प्रती अपलोड करणे आणि आवश्यक कागदपत्रांसह योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला अर्ज पडताळणी व पुष्टीकरणासाठी स्पीड पोस्ट/कुरिअर/हँड डिलिव्हरीद्वारे प्राचार्य, एस.बी.एम. पॉलिटेक्निक, विलेपार्ले (वेस्ट), कूपर हॉस्पिटल जवळ, मुंबई- ४०००५६ या पत्यावर पाठवणे आवश्यक राहील.
- एनआरआय उमेदवारांच्या बाबतीत, एफसीकडे त्यांचे अर्ज नोंदणी आणि पुष्टी झाल्यानंतर जेथे योग्य अधिकार्याने असा कोटा मंजूर केला आहे अशा संस्थेकडे थेट प्रवेशासाठी जाणे आवश्यक आहे तथापि, डीटीई अशा नोंदणीकृत आणि पात्र उमेदवारांची यादी स्वतंत्रपणे वेबसाइटवर प्रकाशित करू शकते.

**क(३) अधिसंख्य जागांचे वाटप**

(१) जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील विस्थापित झालेल्या उमेदवारांसाठीच्या जागा सक्षम प्राधिकरणाकडून भरण्यात येतील. उपलब्ध जागांची संख्या शासनाच्या धोरणानुसार असेल.

**जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील विस्थापित झालेल्या उमेदवारांसाठी प्रवेशाचे निकष / प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

प्रत्येक अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्यातील सर्व पॉलिटेक्निक/ संस्थांमध्ये मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा एका अधिक जागेची तरतूद उपलब्ध आहे.

प्रकार-J१: आतंकवादी कारवायांमुळे १९९० पासून जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधून भारताच्या कोणत्याही भागात किंवा जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र च्या असुरक्षित सीमाक्षेत्रातून, जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील त्यामानाने सुरक्षित ठिकाणी विस्थापित होऊन आलेले आहेत अशा नागरिकांची मुले; किंवा

प्रकार-J२: भारतीय प्रशासकीय सेवा (भाप्रसे) किंवा भारतीय पोलीस सेवा (भापोसे) किंवा भारतीय विदेश सेवा (भाविसे) यामधील अधिकाऱ्यांची मुले आणि अतिरेकी कारवायांचा बिमोड करण्यासाठी जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मध्ये बदली झालेल्या, तसेच केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी आवेदनपत्र सादर

करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा त्यापूर्वी कामावर रुजू झालेल्या लष्करी व निमलष्करी दलातील कर्मचाऱ्यांची मुले; किंवा

प्रकार-J३: अतिरेकी कारवायांचा सामना करण्यासाठी कार्यरत असलेल्या जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र पोलीस दलातील कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची मुले

प्रकार-J४: काश्मीर खोऱ्यांमध्ये राहत असलेल्या काश्मिरी पंडित/काश्मिरी हिंदू कुटुंबे (निवासी) आणि ज्यांच्याकडे अधिवास प्रमाणपत्र आहे अशा नागरिकांची मुले

- प्रवेश प्रक्रिया
  - या जागांचे प्रवेश सर्व पात्र जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील विस्थापित झालेल्या उमेदवारांच्या एकत्रित गुणवत्ता यादीच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे केले जातात. जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील विस्थापित झालेल्या उमेदवारांच्या राखीव जागांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणा उमेदवारांना समुपदेशनद्वारे प्रवेशाच्या वेळी दाव्याच्या समर्थनार्थ प्रोफोर्मा-J/K/L/M मध्ये दाखविलेले संबंधित प्रमाणपत्रे सादर करावेत.
  - या तरतुदीअंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार ऑनलाईन पद्धतीने (क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड / नेट बँकिंग) अर्ज फी भरून ऑनलाईन अर्ज ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे भरतील.
  - कोणत्याही स्थितीमध्ये या कोट्यात रिक्त राहिलेल्या जागा इतर कोणत्याही वर्गातील उमेदवारांना देण्यात येणार नाहीत.
  - या तरतुदीनुसार प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना अभ्यासाच्या कोणत्याही वर्षामध्ये अभ्यासक्रम किंवा महाविद्यालय बदलण्याची परवानगी नाही. जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र विस्थापित उमेदवारांच्या जागांच्या तसेच महाराष्ट्र राज्यातील जागा या दोन्ही प्रकारांमध्ये अर्ज करण्यास पात्र असलेले उमेदवार यापैकी कोणत्याही एकाच जागेसाठी दावा करण्यास पात्र असतील.
- जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील विस्थापित झालेल्या उमेदवारांसाठी निर्धारित प्रवेश केंद्रात समुपदेशन फेरी
  - या कोट्यांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी, प्रवेशासाठी प्रवेश प्राधिकरणाच्या प्रवेश केंद्रात वैयक्तिकरित्या निर्धारित वेळापत्रकाप्रमाणे उपस्थित राहावे.
  - उमेदवार त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ प्रोफोर्मा नुसारच कागदोपत्री पुरावे सादर करतील.
  - निर्धारित केलेल्या वेळापत्रकानुसार, निश्चित केलेल्या प्रवेश केंद्रात प्रवेश घेण्यासाठी वैयक्तिकरित्या उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांकडून गुणवत्तेनुसार या प्रवेशाची काटेकोरपणे पूर्तता केली जाईल. त्यानंतर उमेदवार वाटप केलेल्या संस्थेला जाऊन भेट देईल.
  - प्रवेशासाठी उशीरा येणाऱ्या उमेदवारांसाठी, त्यावेळी उपलब्ध असलेल्या जागांचा वाटपासाठी विचार करण्यात येईल. प्रभारी प्रवेश केंद्राचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

(२) भारताचे समुद्रापार नागरिक (ओसीआय) / भारतीय वंशाचे नागरिक (पीआयओ), परदेशी विद्यार्थी आणि आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले या प्रवर्गातील उमेदवारांसाठीच्या जागा संस्थेकडून भरण्यात

येतील. या जागांची संख्या मंजूर प्रवेश संख्या जागांच्या १५% किंवा समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या मान्यतेनुसार असेल.

**ओसीआय / पीआयओ, परदेशी विद्यार्थी आणि आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले उमेदवारांसाठी प्रवेशाचे निकष / प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

- आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले, ओसीआय/पीआयओ/परदेशी विद्यार्थी या प्रवर्गातील उमेदवारांसाठी, एआयसीटीई कडून संबंधित संस्थेकडून पूर्व परवानगीच्या अधीन राहून, संस्थेच्या मंजूर क्षमतेच्या १५% अधिक जागा उपलब्ध असू शकतील. या १५% पैकी १/३ जागा आखाती देशातील भारतीय कामगारांची मुलांसाठी आणि या १५% पैकी २/३ जागा ओसीआय/पीआयओ/परदेशी नागरिक इत्यादींसाठी आरक्षित असतील. जर आखाती देशातील भारतीय कामगारांच्या मुलांसाठी राखीव असलेल्या १/३ जागांपैकी एखाद्या पाठ्यक्रमातील जागा रिक्त राहिल्या तर, अशा रिक्त जागा, भारताचे समुद्रपार नागरिक (ओसीआय), भारतीय वंशाच्या व्यक्ती (पीआयओ) किंवा विदेशी विद्यार्थी यांच्या उमेदवारांसाठी राखीव असलेल्या २/३ जागेमध्ये समाविष्ट करुन या उमेदवारांमधून भरण्यात येतील. तसेच याची विरुद्ध तरतूद देखील लागू आहे.
- या जागा उमेदवारांकडून परस्पर गुणवत्तेच्या आधारे संस्थेद्वारे भरल्या जातील. परस्पर गुणवत्तेची प्रक्रिया या माहितीपत्रकाच्या नियम ८ मध्ये दिलेली आहे.
- या कोट्या अंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या ओसीआय/पीआयओ/परदेशी विद्यार्थी /आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले, उमेदवारांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया, चालू शैक्षणिक वर्षात संबंधित संस्थांना या कोट्यासाठी एआयसीटीईकडून मान्यता मिळेल या अटींच्या अधीन राहून असेल.
- या तरतुदीअंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार ऑनलाईन पद्धतीने (क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड / नेट बँकिंग) अर्ज फी भरून ऑनलाईन अर्ज भरतील, त्यानंतर अर्जाची प्रिंटआउट घेणे, स्कॅन केलेल्या आवश्यक कागदपत्रांची प्रती अपलोड करणे आणि आवश्यक कागदपत्रांसह योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला अर्ज पडताळणी व पुष्टीकरणासाठी स्पीड पोस्ट/कुरिअर/हँड डिलिव्हरीद्वारे प्राचार्य, एस.बी.एम. पॉलिटेक्निक, विलेपार्ले (वेस्ट), कूपर हॉस्पिटल जवळ, मुंबई- ४०००५६ या पत्यावर पाठवणे आवश्यक राहील.
- ओसीआय/पीआयओ/परदेशी विद्यार्थी/आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले, उमेदवारांच्या बाबतीत, एफसीकडे त्यांचे अर्ज नोंदणी आणि पुष्टी झाल्यानंतर जेथे योग्य अधिकार्याने असा कोटा मंजूर केला आहे अशा संस्थेकडे थेट प्रवेशासाठी जाणे आवश्यक आहे तथापि, डीटीई अशा नोंदणीकृत आणि पात्र उमेदवारांची यादी स्वतंत्रपणे वेबसाइटवर प्रकाशित करू शकते.

(३) सक्षम प्राधिकरणाद्वारे भरावयाचे व भारत सरकारने ज्या ठिकाणी तांत्रिक शिक्षणातील सुविधा उपलब्ध नाहीत अशा ठिकाणचे नामनिर्देशित केलेले उमेदवार- जागांची संख्या मानव संसाधन विकास मंत्रालय (एमएचआरडी), भारत सरकारद्वारे निश्चित करण्यात येईल.

**भारत सरकार नामनिर्देशित उमेदवारांसाठी प्रवेशाचे निकष / प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

- वेळापत्रकानुसार, उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्रांच्या छाननीसाठी आणि प्रवेश पत्र प्राप्त करण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य येथे भेट देणे आवश्यक आहे.

- भारत सरकारचे नामनिर्देशित उमेदवार, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई- ४००००१ येथून प्रवेश पत्र प्राप्त केल्याशिवाय थेट संस्थेला जाणार नाहीत. संस्थेच्या प्राचार्यांनी अशा उमेदवाराला थेट प्रवेश देऊ नये आणि उमेदवाराला वर नमूद केलेल्या कार्यालयात भेट देण्यास सांगावे.
- संबंधित राज्यांनी नामांकित केलेल्या उमेदवारांना फक्त आणि फक्त नियम ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रता पूर्ण केल्यासच प्रवेश दिला जाईल. प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडून (एमएसबीएसएचएसई) पात्रता प्रमाणपत्र घ्यावे लागेल.
- भारत सरकारचे नामनिर्देशित उमेदवार जे मागासवर्गीय प्रवर्गातील आहेत अशांना शिक्षण शुल्कामध्ये कोणतीही सूट मिळणार नाही.
- या तरतुदीनुसार प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना अभ्यासाच्या कोणत्याही वर्षामध्ये अभ्यासक्रम किंवा महाविद्यालय बदलण्याची परवानगी नाही.

(४) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या केंद्र सरकारकडुन समर्थित “दिव्यांग व्यक्तींना समाकलीत करण्यासाठी विद्यमान तंत्रनिकेतन विकसित करणे” या योजनेंतर्गत उपलब्ध असलेल्या जागा (दिव्यांगाकरीता)-या जागा संबधित संस्थेद्वारे भरण्यात येतील.

**दिव्यांगाकरीता उमेदवारांसाठी प्रवेशाचे निकष / प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

- भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत दिव्यांग व्यक्तींकरिता, प्रत्येक अभ्यासक्रमातील पाच (५) जागा (प्रत्येक संस्थेकडील जास्तीत जास्त २५ जागा) खालील संस्थांमध्ये मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त उपलब्ध आहेत.
  1. शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई
  2. शासकीय तंत्रनिकेतन, पुणे
  3. शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर
- दिव्यांगत्व मापदंड आणि या उमेदवारांसाठी पात्रतेच्या इतर अटी भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार असतील. वरीलपैकी प्रत्येक संस्था एआयसीटीईने मंजूर केल्याप्रमाणे विशिष्ट शाखांमध्ये प्रवेश घेण्यासाठी अर्ज आमंत्रित करण्यासाठी जाहिरात देईल.
- या तरतुदीनुसार प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार प्रथम ऑनलाईन कॅप अर्ज भरून सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करतील आणि त्यानंतर संस्थेच्या अधिसूचनेनुसार संबंधित संस्थांना योग्य रित्या भरलेले स्वतंत्र अर्ज सादर करतील.
- संबंधित संस्थांनी अशा उमेदवारांचे प्रवेश तातडीने ऑनलाइन प्रवेश प्रणालीद्वारे अपलोड करणे आवश्यक राहील.

(५) सक्षम प्राधिकरणाद्वारे भरल्या जाणाऱ्या मॉरीशसमधील (एमआर) मराठी भाषिक उमेदवारांसाठी- मॉरीशसमधील मराठी बोलणाऱ्या मुला-मुलींसाठी राज्यात पाच जागा उपलब्ध आहेत. या जागा राज्यातील कोणत्याही संस्थेला दिल्या जातील.

**मॉरीशसच्या (एमआर) मराठी भाषिक उमेदवारांसाठी प्रवेशाचे निकष / प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

- वेळापत्रकानुसार, उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्रांच्या छाननीसाठी आणि प्रवेश पत्र प्राप्त करण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य येथे भेट देणे आवश्यक आहे.
- या उमेदवारांचे वडील / आई मॉरीशसचे नागरिक असले पाहिजेत आणि अर्जदाराने, मॉरीशसमधील मराठी भाषिक समुदायापैकी असण्याबाबत, भारतीय उच्चायुक्तांकडून प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- महाराष्ट्रातील अभ्यासासाठी संबंधित सर्व खर्च उमेदवार करतील आणि त्यांना प्रवेश किंवा शिक्षण सुरू ठेवण्यास कोणतीही सवलत मिळणार नाही.
- संबंधित राज्यांनी नामांकित केलेल्या उमेदवारांना फक्त आणि फक्त नियम ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रता पूर्ण केल्यासच प्रवेश दिला जाईल. प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडून (एमएसबीएसएचएसई) पात्रता प्रमाणपत्र घ्यावे लागेल.
- या तरतुदीनुसार प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना अभ्यासाच्या कोणत्याही वर्षामध्ये अभ्यासक्रम किंवा महाविद्यालय बदलण्याची परवानगी नाही.

(६) सक्षम प्राधिकरणाद्वारे भरावयाचे नॅशनल कॅडेट कोर्प्स (एन. सी. सी.) उमेदवारांसाठी जागा- शासनाच्या धोरणानुसार राज्यात पंधरा जागा उपलब्ध आहेत.

**एन. सी. सी. उमेदवारांसाठी प्रवेशाचे निकष / प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

- दहावीनंतरच्या प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांमध्ये मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त १५ जागा एन. सी. सी. उमेदवारांसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. एन.सी.सी. कोट्यांतर्गत प्रवेश घेणाऱ्या उमेदवाराने नियम ४ मध्ये नमूद पात्रता निकष व्यतिरिक्त खालील अटी पूर्ण करणे आवश्यक आहे.
- या तरतुदीअंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणा पात्र उमेदवारांनी प्रथम सक्षम प्राधिकरणाकडे ऑनलाईन कॅप अर्ज भरावा.
- एनसीसी उमेदवारांसाठी पात्रतेसाठी अतिरिक्त निकष खालीलप्रमाणे आहेत.
    १. अखिल भारतीय पातळीवर महाराष्ट्राच्या प्रतिनिधित्वाचे प्रमाणपत्र
    २. एन.सी.सी. च्या दोन वर्षात किमान ७०% उपस्थितीचे प्रमाणपत्र
    ३. एन.सी.सी. 'अ 'प्रमाणपत्र
- एनसीसी कोटा अंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार त्यांचे अर्ज, एनसीसीने अधिसूचित केलेल्या वेळापत्रकानुसार एनसीसीच्या प्रवेश प्राधिकरण अधिकाऱ्यांकडे पोहचतील अशा प्रकारे त्यांच्या अर्जांची अंमलबजावणी करतील.
- ऑनलाईन अर्ज भरून सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज केल्यानंतर एनसीसीच्या कोट्यांतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी त्यांच्या संबंधित एनसीसी युनिटमध्ये, ज्यात या विद्यार्थ्यांची नावनोंदणी झाली आहे, तेथे आवश्यक कागदपत्रांसह स्वतंत्र अर्ज सादर करावेत. एनसीसी युनिट्स असे अर्ज पडताळणी व शिफारसीसाठी, संचालक,एन.सी.सी., महाराष्ट्र राज्य, ए.एफ.आय.बिल्डिंग, मुंबई हॉस्पिटल लेन, मेट्रो सिनेमाजवळ, मुंबई -४०००२० येथे पाठवतील. संचालक, एन.सी.सी. महाराष्ट्र राज्य, यांनी शिफारस केलेल्या उमेदवारांचीच नावे गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट करण्यात येतील.

- या जागांचे वाटप उमेदवारांनी निवड केलेल्या अभ्यासक्रमात व संस्थेत केले जाईल. या श्रेणीअंतर्गत कोणत्याही संस्थेला मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त, एका जागेहून अधिक जागा मिळणार नाहीत.

(७) ट्युशन फी वेव्हर योजना (टीएफडब्ल्यूएस)-मंजूर केलेल्या प्रवेश क्षमतेच्या ५% अधिसंख्या जागा किंवा समुचित प्राधिकरणाद्वारे वेळोवेळी नेमून दिलेल्या जागा. ह्या जागा सक्षम प्राधिकरणाद्वारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियांमार्फत भरल्या जातील.

**ट्युशन फी वेव्हर योजना (टीएफडब्ल्यूएस) उमेदवारांसाठी प्रवेशाचे निकष / प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

- प्रति अभ्यासक्रम मंजूर क्षमतेच्या जास्तीत जास्त ५% जागा प्रवेशासाठी उपलब्ध राहतील आणि केवळ सक्षम प्राधिकरणामार्फत घेण्यात आलेल्या केंद्रीकृत प्रवेश प्रक्रियेद्वारे या जागा भरलया जातील.
- ही योजना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मंजूर केलेल्या सर्व पदविका अभ्यासक्रम आणि थेट प्रवेश देणारे अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांकरिता अनिवार्य असेल.
- या जागा अधिसंख्या जागा असतील. या अधिसंख्य जागा केवळ अशा संस्थांमध्ये अशा अभ्यासक्रमांना उपलब्ध असतील ज्या अभ्यासक्रमांना मागील शैक्षणिक वर्षात “मंजूर प्रवेशक्षमतेच्या” किमान ५०% प्रवेश झालेले आहेत.
- ही सवलतीची मर्यादा, विनाअनुदानित संस्थांच्या बाबतीत राज्य शासन शुल्क नियमन प्राधिकरणाने मान्यता दिलेले शिक्षण शुल्क आणि शासकीय व अ-शासकीय अनुदानित संस्थांच्या बाबतीत शासनाने मंजूर केलेले शिक्षण शुल्क, अशी राहील. शिक्षण शुल्क वगळता इतर सर्व शुल्क विद्यार्थ्याने भरणे आवश्यक आहे.
- या योजनेत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत संस्था / अभ्यासक्रम बदलण्याची संधी दिली जाणार नाही.
- या जागांसाठी फक्त “महाराष्ट्र राज्य उमेदवार” पात्र आहेत.
- सर्व स्त्रोतांकडून पालकांचे वार्षिक उत्पन्न रू ८.०० लाखांपेक्षा जास्त नाही अशा पात्र महाराष्ट्र राज्य उमेदवारांकरीता ह्या जागा आहेत.
- या जागा परस्पर गुणवत्तेनुसार सक्षम प्राधिकरणाद्वारे वाटण्यात येतील. यासाठी, सक्षम प्राधिकरण महाराष्ट्र राज्य उमेदवारांना लागु असलेल्या निकषांप्रमाणे, या जागांसाठी अर्ज मागवू शकेल, स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करेल. या जागांसाठी विद्यार्थ्यांची अनुपलब्धता असल्यास इतर कोणत्याही अर्जदारांना या जागा दिलया जाणार नाहीत.

## अनुसूची - दोन

### (एचएससी नंतरच्या पदविका पाठ्यक्रमाच्या प्रवेशाकरिता)

### (नियम ६ व ७ पहा)

ख (१) . पदविका अभ्यासक्रमासाठी शासकीय , अशासकीय अनुदानित तांत्रिक पदविका संस्थांतील जागांचे वाटप

| अ.क्र. | संस्थेचा प्रकार | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील जागांची संख्या - मंजूर प्रवेशक्षमतेच्या टक्केवारीप्रमाणे (अनिवासी भारतीय (एनआरआय) वगळून) | |
|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण जागा | अल्पसंख्याकासाठीच्या जागा |
| १ | सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित संस्था (स्वायत्त संस्था सह परंतु अल्पसंख्याकासाठीच्या संस्था वगळून) | १०० टक्के | निरंक |
| २ | शासकीय, अशासकीय अनुदानित अल्पसंख्याकासाठीच्या संस्था संस्था (स्वायत्त संस्था सह) | ५० टक्के | ५० टक्के |
| ह्या जागा केवळ महाराष्ट्र राज्य उमेदवारांसाठी उपलब्ध आहेत. | | | |

ख (२) . पदविका अभ्यासक्रमासाठी विनाअनुदानित खाजगी तांत्रिक पदविका संस्थांतील जागांचे वाटप

| अ.क्र. | संस्थेचा प्रकार | जागांची संख्या - मंजूर प्रवेशक्षमतेच्या टक्केवारीप्रमाणे | | |
|---|---|---|---|---|
| | | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया जागा | | संस्थास्तरीय जागा (अनिवासी भारतीयांसाठी ५ टक्के कोट्यासह , लागू असेल तर) |
| | | महाराष्ट्र राज्यातील उमेदवार | अल्पसंख्याका साठीच्या जागा | |
| १ | विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (अल्पसंख्याका साठीच्या संस्था वगळून) | ८० टक्के | निरंक | २० टक्के |
| २ | विना अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था | महाराष्ट्र राज्यातील जागांपैकी$ १०० टक्के | किमान@ ५१ टक्के | २० टक्के |

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) जागा = मंजूर प्रवेशसंख्या - संस्थास्तरीय जागा

$महाराष्ट्र राज्यातील जागा = केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील जागा - अल्पसंख्यांक उमेदवारासाठीच्या जागा)

% टक्केवारी

* अल्पसंख्यांक उमेदवारासाठीच्या जागा व संस्थास्तरावरील जागा वगळता या जागा महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेल्या व अखिल भारतीय उमेदवारी असलेल्या उमेदवारामधून निर्धारित प्रमाणामध्ये भरण्यात येतील.

@अल्पसंख्यांक संस्था कमीत कमी टक्के एवढ्या जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून (अल्पसंख्यांक समुदायाच्या उमेदवारामधून) भरेल. हि संख्या कमाल १०० टक्के असू शकेल. तथापि प्रत्येक अल्पसंख्यांक संस्था प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी, त्यांच्या संस्थेतील अल्पसंख्यांक कोट्यातून भरावयाच्या जास्तीत जास्त टक्के (जागा) घोषित करतील आणि सक्षम प्राधीकाऱ्याला कळवतील.

**एनआरआय उमेदवारांची प्रवेश प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे**

- संस्था स्तरावर योग्य प्राधिकरणाने मंजूर केल्यास, एनआरआय उमेदवारांकडून जास्तीत जास्त ५% जागा भरल्या जाऊ शकतात
- या अनिवासी भारतीय कोट्यासाठी राखीव जागा रिक्त राहिल्यास, त्या रिक्त जागा अखिल भारतीय उमेदवाराच्या पात्र उमेदवारांकडून संस्थेद्वारे भरल्या जाऊ शकतात.
- परंतु या रिक्त जागा भरताना परस्पर गुणवत्तेच्या आधारे महाराष्ट्र राज्य उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.
- या जागा उमेदवारांकडून परस्पर गुणवत्तेच्या आधारे संस्थेद्वारे भरल्या जातील. परस्पर गुणवत्तेची प्रक्रिया या माहितीपत्रकाच्या नियम ८ मध्ये दिलेली आहे.
- एनआरआय कोट्या अंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणा एनआरआय उमेदवारांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया, चालू शैक्षणिक वर्षात संबंधित संस्थांना या कोटासाठी एआयसीटीईकडून मान्यता मिळेल या अटींच्या अधीन राहून असेल.
- या तरतुदीअंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार ऑनलाईन पद्धतीने (क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड / नेट बँकिंग) अर्ज फी भरून ऑनलाईन अर्ज भरतील, त्यानंतर अर्जाची प्रिंटआउट घेणे, स्कॅन केलेल्या आवश्यक कागदपत्रांची प्रती अपलोड करणे आणि आवश्यक कागदपत्रांसह योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला अर्ज पडताळणी व पुष्टीकरणासाठी स्पीड पोस्ट/कुरिअर/हँड डिलिव्हरीद्वारे प्राचार्य, एस.बी.एम. पॉलिटेक्निक, विलेपार्ले (वेस्ट), कूपर हॉस्पिटल जवळ, मुंबई- ४०००५६ या पत्यावर पाठवणे आवश्यक राहील.
- एनआरआय उमेदवारांच्या बाबतीत, एफसीकडे त्यांचे अर्ज नोंदणी आणि पुष्टी झाल्यानंतर जेथे योग्य अधिकार्याने असा कोटा मंजूर केला आहे अशा संस्थेकडे थेट प्रवेशासाठी जाणे आवश्यक आहे तथापि, डीटीई अशा नोंदणीकृत आणि पात्र उमेदवारांची यादी स्वतंत्रपणे वेबसाइटवर प्रकाशित करू शकते.

**ख(३) अधिसंख्य जागांचे वाटप**

(१) जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील विस्थापित झालेल्या उमेदवारांसाठीच्या जागा सक्षम प्राधिकरणाकडून भरण्यात येतील. उपलब्ध जागांची संख्या शासनाच्या धोरणानुसार असेल.

**जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील विस्थापित झालेल्या उमेदवारांसाठी प्रवेशाचे निकष / प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

या जागा औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम वगळता इतर पदविका अभ्यासक्रमांना देण्यात आल्या आहेत.
प्रत्येक अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्यातील सर्व पॉलिटेक्निक/ संस्थांमध्ये मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा एका अधिक जागेची तरतूद उपलब्ध आहे.

प्रकार-J१: आतंकवादी कारवायांमुळे १९९० पासून जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधून भारताच्या कोणत्याही भागात किंवा जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र च्या असुरक्षित सीमाक्षेत्रातून, जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील त्यामानाने सुरक्षित ठिकाणी विस्थापित होऊन आलेले आहेत अशा नागरिकांची मुले; किंवा
प्रकार-J२: भारतीय प्रशासकीय सेवा (भाप्रसे) किंवा भारतीय पोलीस सेवा (भापोसे) किंवा भारतीय विदेश सेवा (भाविसे) यामधील अधिकाऱ्यांची मुले आणि अतिरेकी कारवायांचा बिमोड करण्यासाठी जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मध्ये बदली झालेल्या, तसेच केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी आवेदनपत्र सादर

करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा त्यापूर्वी कामावर रुजू झालेल्या लष्करी व निमलष्करी दलातील कर्मचाऱ्यांची मुले; किंवा

प्रकार-J३: अतिरेकी कारवायांचा सामना करण्यासाठी कार्यरत असलेल्या जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र पोलीस दलातील कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची मुले

प्रकार-J४: काश्मीर खोऱ्यांमध्ये राहत असलेल्या काश्मिरी पंडित/काश्मिरी हिंदू कुटुंबे (निवासी) आणि ज्यांच्याकडे अधिवास प्रमाणपत्र आहे अशा नागरिकांची मुले

- प्रवेश प्रक्रिया
  - या जागांचे प्रवेश सर्व पात्र जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील विस्थापित झालेल्या उमेदवारांच्या एकत्रित गुणवत्ता यादीच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे केले जातात. जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील विस्थापित झालेल्या उमेदवारांच्या राखीव जागांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणा उमेदवारांना समुपदेशनद्वारे प्रवेशाच्या वेळी दाव्याच्या समर्थनार्थ प्रोफोर्मा-J/K/L /M मध्ये दाखविलेले संबंधित प्रमाणपत्रे सादर करावेत.
  - या तरतुदीअंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार ऑनलाईन पद्धतीने (क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड / नेट बँकिंग) अर्ज फी भरून ऑनलाईन अर्ज ई-स्क्रूटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पध्दत यांद्वारे भरतील.
  - कोणत्याही स्थितीमध्ये या कोट्यात रिक्त राहिलेल्या जागा इतर कोणत्याही वर्गातील उमेदवारांना देण्यात येणार नाहीत.
  - या तरतुदीनुसार प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना अभ्यासाच्या कोणत्याही वर्षामध्ये अभ्यासक्रम किंवा महाविद्यालय बदलण्याची परवानगी नाही. जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र विस्थापित उमेदवारांच्या जागांच्या तसेच महाराष्ट्र राज्यातील जागा या दोन्ही प्रकारांमध्ये अर्ज करण्यास पात्र असलेले उमेदवार यापैकी कोणत्याही एकाच जागेसाठी दावा करण्यास पात्र असतील.

- जम्मू व काश्मीर संघराज्य क्षेत्र आणि लडाख संघराज्य क्षेत्र मधील विस्थापित झालेल्या उमेदवारांसाठी निर्धारित प्रवेश केंद्रात समुपदेशन फेरी
  - या कोट्यांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी, प्रवेशासाठी प्रवेश प्राधिकरणाच्या प्रवेश केंद्रात वैयक्तिकरित्या निर्धारित वेळापत्रकाप्रमाणे उपस्थित राहावे.
  - उमेदवार त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ प्रोफोर्मा नुसारच कागदोपत्री पुरावे सादर करतील.
  - निर्धारित केलेल्या वेळापत्रकानुसार, निश्चित केलेल्या प्रवेश केंद्रात प्रवेश घेण्यासाठी वैयक्तिकरित्या उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांकडून गुणवत्तेनुसार या प्रवेशाची काटेकोरपणे पूर्तता केली जाईल. त्यानंतर उमेदवार वाटप केलेल्या संस्थेला जाऊन भेट देईल.
  - प्रवेशासाठी उशीरा येणाऱ्या उमेदवारांसाठी, त्यावेळी उपलब्ध असलेल्या जागांचा वाटपासाठी विचार करण्यात येईल. प्रभारी प्रवेश केंद्राचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

(२) भारताचे समुद्रापार नागरिक (ओसीआय) / भारतीय वंशाचे नागरिक (पीआयओ), परदेशी विद्यार्थी आणि आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले या प्रवर्गातील उमेदवारांसाठीच्या जागा संस्थेकडून भरण्यात

येतील. या जागांची संख्या मंजूर प्रवेश संख्या जागांच्या १५% किंवा समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या मान्यतेनुसार असेल.

**ओसीआय / पीआयओ, परदेशी विद्यार्थी आणि आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले उमेदवारांसाठी प्रवेशाचे निकष / प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

- आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले, ओसीआय/पीआयओ/परदेशी विद्यार्थी या प्रवर्गातील उमेदवारांसाठी, एआयसीटीई कडून संबंधित संस्थेकडून पूर्व परवानगीच्या अधीन राहून, संस्थेच्या मंजूर क्षमतेच्या १५% अधिक जागा उपलब्ध असू शकतील. या १५% पैकी १/३ जागा आखाती देशातील भारतीय कामगारांची मुलांसाठी आणि या १५% पैकी २/३ जागा ओसीआय/पीआयओ/परदेशी नागरिक इत्यादींसाठी आरक्षित असतील. जर आखाती देशातील भारतीय कामगारांच्या मुलांसाठी राखीव असलेल्या १/३ जागांपैकी एखाद्या पाठ्यक्रमातील जागा रिक्त राहिल्या तर, अशा रिक्त जागा, भारताचे समुद्रपार नागरिक (ओसीआय), भारतीय वंशाच्या व्यक्ती (पीआयओ) किंवा विदेशी विद्यार्थी यांच्या उमेदवारांसाठी राखीव असलेल्या २/३ जागेमध्ये समाविष्ट करुन या उमेदवारांमधून भरण्यात येतील. तसेच याची विरुद्ध तरतूद देखील लागू आहे.
- या जागा उमेदवारांकडून परस्पर गुणवत्तेच्या आधारे संस्थेद्वारे भरल्या जातील. परस्पर गुणवत्तेची प्रक्रिया या माहितीपत्रकाच्या नियम ८ मध्ये दिलेली आहे.
- या कोट्या अंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या ओसीआय/पीआयओ/परदेशी विद्यार्थी /आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले, उमेदवारांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया, चालू शैक्षणिक वर्षात संबंधित संस्थांना या कोट्यासाठी एआयसीटीईकडून मान्यता मिळेल या अटींच्या अधीन राहून असेल.
- या तरतुदीअंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार ऑनलाईन पद्धतीने (क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड / नेट बँकिंग) अर्ज फी भरून ऑनलाईन अर्ज भरतील, त्यानंतर अर्जाची प्रिंटआउट घेणे, स्कॅन केलेल्या आवश्यक कागदपत्रांची प्रती अपलोड करणे आणि आवश्यक कागदपत्रांसह योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला अर्ज पडताळणी व पुष्टीकरणासाठी स्पीड पोस्ट/कुरिअर/हँड डिलिव्हरीद्वारे प्राचार्य, एस.बी.एम. पॉलिटेक्निक, विलेपार्ले (वेस्ट), कूपर हॉस्पिटल जवळ, मुंबई- ४०००५६ या पत्यावर पाठवणे आवश्यक राहील.
- ओसीआय/पीआयओ/परदेशी विद्यार्थी/आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले, उमेदवारांच्या बाबतीत, एफसीकडे त्यांचे अर्ज नोंदणी आणि पुष्टी झाल्यानंतर जेथे योग्य अधिकार्याने असा कोटा मंजूर केला आहे अशा संस्थेकडे थेट प्रवेशासाठी जाणे आवश्यक आहे तथापि, डीटीई अशा नोंदणीकृत आणि पात्र उमेदवारांची यादी स्वतंत्रपणे वेबसाइटवर प्रकाशित करू शकते.

(३) सक्षम प्राधिकरणाद्वारे भरावयाचे व भारत सरकारने ज्या ठिकाणी तांत्रिक शिक्षणातील सुविधा उपलब्ध नाहीत अशा ठिकाणचे नामनिर्देशित केलेले उमेदवार- जागांची संख्या मानव संसाधन विकास मंत्रालय (एमएचआरडी), भारत सरकारद्वारे निश्चित करण्यात येईल.

**भारत सरकार नामनिर्देशित उमेदवारांसाठी प्रवेशाचे निकष / प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

- वेळापत्रकानुसार, उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्रांच्या छाननीसाठी आणि प्रवेश पत्र प्राप्त करण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य येथे भेट देणे आवश्यक आहे.
- भारत सरकारचे नामनिर्देशित उमेदवार, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई- ४००००१ येथून प्रवेश पत्र प्राप्त केल्याशिवाय थेट संस्थेला जाणार नाहीत. संस्थेच्या प्राचार्यांनी अशा उमेदवाराला थेट प्रवेश देऊ नये आणि उमेदवाराला वर नमूद केलेल्या कार्यालयात भेट देण्यास सांगावे.
- संबंधित राज्यांनी नामांकित केलेल्या उमेदवारांना फक्त आणि फक्त नियम ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रता पूर्ण केल्यासच प्रवेश दिला जाईल. प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडून (एमएसबीएसएचएसई) पात्रता प्रमाणपत्र घ्यावे लागेल.
- भारत सरकारचे नामनिर्देशित उमेदवार जे मागासवर्गीय प्रवर्गातील आहेत अशांना शिक्षण शुल्कामध्ये कोणतीही सूट मिळणार नाही.
- या तरतुदीनुसार प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना अभ्यासाच्या कोणत्याही वर्षामध्ये अभ्यासक्रम किंवा महाविद्यालय बदलण्याची परवानगी नाही.

(४) ट्युशन फी वेव्हर योजना (टीएफडब्ल्यूएस)-मंजूर केलेल्या प्रवेश क्षमतेच्या ५% अधिसंख्या जागा किंवा समुचित प्राधिकरणाद्वारे वेळोवेळी नेमून दिलेल्या जागा. ह्या जागा सक्षम प्राधिकरणाद्वारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियांमार्फत भरल्या जातील.

**ट्युशन फी वेव्हर योजना (टीएफडब्ल्यूएस) उमेदवारांसाठी प्रवेशाचे निकष / प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

- प्रति अभ्यासक्रम मंजूर क्षमतेच्या जास्तीत जास्त ५% जागा प्रवेशासाठी उपलब्ध राहतील आणि केवळ सक्षम प्राधिकरणामार्फत घेण्यात आलेल्या केंद्रीकृत प्रवेश प्रक्रियेद्वारे या जागा भरलया जातील.
- ही योजना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने /पीसीआय मंजूर केलेल्या सर्व पदविका अभ्यासक्रम आणि थेट प्रवेश देणारे अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांकरिता अनिवार्य असेल.
- या जागा अधिसंख्या जागा असतील. या अधिसंख्य जागा केवळ अशा संस्थांमध्ये अशा अभ्यासक्रमांना उपलब्ध असतील ज्या अभ्यासक्रमांना मागील शैक्षणिक वर्षात “मंजूर प्रवेशक्षमतेच्या” किमान ५०% प्रवेश झालेले आहेत.
- ही सवलतीची मर्यादा, विनाअनुदानित संस्थांच्या बाबतीत राज्य शासन शुल्क नियमन प्राधिकरणाने मान्यता दिलेले शिक्षण शुल्क आणि शासकीय व अ-शासकीय अनुदानित संस्थांच्या बाबतीत शासनाने मंजूर केलेले शिक्षण शुल्क, अशी राहील. शिक्षण शुल्क वगळता इतर सर्व शुल्क विद्यार्थ्याने भरणे आवश्यक आहे.
- या योजनेत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत संस्था / अभ्यासक्रम बदलण्याची संधी दिली जाणार नाही.
- या जागांसाठी फक्त “महाराष्ट्र राज्य उमेदवार” पात्र आहेत.
- सर्व स्त्रोतांकडून पालकांचे वार्षिक उत्पन्न रू ८.०० लाखांपेक्षा जास्त नाही अशा पात्र महाराष्ट्र राज्य उमेदवारांकरीता ह्या जागा आहेत.

- या जागा परस्पर गुणवत्तेनुसार सक्षम प्राधिकरणाद्वारे वाटण्यात येतील. यासाठी, सक्षम प्राधिकरण महाराष्ट्र राज्य उमेदवारांना लागु असलेल्या निकषांप्रमाणे, या जागांसाठी अर्ज मागवू शकेल, स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करेल. या जागांसाठी विद्यार्थ्यांची अनुपलब्धता असल्यास इतर कोणत्याही अर्जदारांना या जागा दिलया जाणार नाहीत.

(५) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या केंद्र सरकारकडुन समर्थित "दिव्यांग व्यक्तींना समाकलीत करण्यासाठी विद्यमान तंत्रनिकेतन विकसित करणे" या योजनेंतर्गत उपलब्ध असलेल्या जागा (दिव्यांगाकरीता)-या जागा संबधित संस्थेद्वारे भरण्यात येतील.

**दिव्यांगाकरीता उमेदवारांसाठी प्रवेशाचे निकष / प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

- भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत दिव्यांग व्यक्तींकरिता, प्रत्येक अभ्यासक्रमातील पाच (५) जागा (प्रत्येक संस्थेकडील जास्तीत जास्त २५ जागा) संस्थांमध्ये मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त उपलब्ध आहेत. शै. व. २०२३-२४ साठी एआयसीटीईकडून कोणतीही जागा मंजूर करण्यात आलेली नाही. नवीनतम यादी संकेतस्थळावर उपलब्ध राहील.
- दिव्यांगत्व मापदंड आणि या उमेदवारांसाठी पात्रतेच्या इतर अटी भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार असतील. वरीलपैकी प्रत्येक संस्था एआयसीटीईने मंजूर केल्याप्रमाणे विशिष्ट शाखांमध्ये प्रवेश घेण्यासाठी अर्ज आमंत्रित करण्यासाठी जाहिरात देईल.
- या तरतुदीनुसार प्रवेश घेऊ इच्छिणारे उमेदवार प्रथम ऑनलाईन कॅप अर्ज भरून सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करतील आणि त्यानंतर संस्थेच्या अधिसूचनेनुसार संबंधित संस्थांना योग्य रित्या भरलेले स्वतंत्र अर्ज सादर करतील.
- संबंधित संस्थांनी अशा उमेदवारांचे प्रवेश तातडीने ऑनलाइन प्रवेश प्रणालीद्वारे अपलोड करणे आवश्यक राहील.

## अनुसुची - तीन
## (एस एस सी नंतरच्या थेट द्वितीय वर्ष पदविका पाठ्यक्रमाच्या प्रवेशाकरिता)
## (नियम ६ व ७ पहा)

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचा (कॅप) विकल्प नमुना सादर करण्यापूर्वी, उपलब्ध जागांची विभागणी संकेतस्थळावर अधिसूचित करण्यात येईल.

(एक) आनुषंगिक प्रवेशासाठीच्या जागा: मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा अधिक अधिसंख्य असलेल्या या जागा मंजूर प्रवेशक्षमतेच्या १० टक्के असतील. (पहा GR No **सीटीसी**-2019/**प्र.क्र**.252/**तांशि** -4, **दि**.02 **ऑगस्ट** 2019)

(दोन) रिक्त जागा:

(क) या नियमाच्या नियम १६ मध्ये दिल्यानुसार संस्था व अभ्यासक्रम बदल केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेवून मागील वर्षात (मंजूर प्रवेशक्षमतेतील) ज्या जागा रिक्त राहिल्या त्या जागा.

(ख) मागील वर्षाच्या दरम्यान राहिलेल्या ईडब्ल्यूएस उमेदवाराच्या रिक्त जागा, थेट द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमांसाठी ईडब्ल्यूएस उमेदवारांकरिता विचारात घेतल्या जातील.

ग (१) . पदविका अभ्यासक्रमासाठी शासकीय , अशासकीय अनुदानित तांत्रिक पदविका संस्थांतील जागांचे वाटप

| अ.क्र | संस्थेचा प्रकार | प्रवेशासाठी उपलब्ध जागा, प्रवेश क्षमतेच्या टक्केवारीमध्ये (रिक्त जागा+ आनुषंगिक प्रवेश जागा ) | |
|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण जागा | अल्पसंख्याकासाठीच्या जागा |
| १ | सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित संस्था (स्वायत्त संस्था सह परंतु अल्पसंख्याकासाठीच्या संस्था वगळून) | १०० टक्के | निरंक |
| २ | शासकीय, अशासकीय अनुदानित अल्पसंख्याकासाठीच्या संस्था संस्था (स्वायत्त संस्था सह) | ५० टक्के | ५० टक्के |
| ३ | शासकीय संस्था (अल्पसंख्याकासाठीच्या तुकडीतील संस्था) ¥ | ३० टक्के | ७० टक्के |
| ह्या जागा केवळ महाराष्ट्र राज्य उमेदवारांसाठी उपलब्ध आहेत<br>¥ -१३ सप्टेंबर २०११ रोजीचा शासन निर्णय क्र टीइडी -२०१० / (३३४/२०१०) / टीई -५ पहा. | | | |

ग (२) . पदविका अभ्यासक्रमासाठी विनाअनुदानित खाजगी तांत्रिक पदविका संस्थांतील जागांचे वाटप

| अ.क्र. | संस्थेचा प्रकार | सक्षम प्राधिकाऱ्याकडील प्रवेशासाठी उपलब्ध जागा मंजूर प्रवेश क्षमतेच्या टक्केवारीमध्ये (रिक्त जागा + आनुषंगिक प्रवेश जागा) | |
|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण जागा | अल्पसंख्याकासाठीच्या जागा |
| १ | विनाअनुदानित खाजगी शैक्षणिक संस्था (अल्पसंख्याका साठीच्या संस्था वगळून) | (आनुषंगिक प्रवेश जागा + रिक्त जागा ) यांच्या १०० टक्के | निरंक |
| २ | विना अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था | (आनुषंगिक प्रवेश जागा + रिक्त जागा) – अल्पसंख्याकासाठीच्या जागा | (आनुषंगिक प्रवेश जागा + रिक्त जागा) यांच्या किमान ५१ टक्के |

ग (३) – एस एस सी नंतरच्या थेट द्वितीय वर्ष पदविका पाठ्यक्रमाच्या प्रवेशाकरिता पात्रतेसाठी आवश्यक अर्हतेनुसार विभागणी

| अनु.क्र | शैक्षणिक अर्हता | सर्वसाधारण जागा |
|---|---|---|
| १ | १० + २ परीक्षा, पुढीलपैकी कोणतेही तीन विषयासह (भौतिकशास्त्र / गणित / रसायनशास्त्र / कॉम्पुटर सायन्स / इलेक्ट्रॉनिक्स / इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी / जीवशास्त्र / इन्फॉर्मेटिक्स प्रॅक्टिसेस/ बायोटेक्नॉलॉजी / टेक्निकल व्होकेशनल सब्जेक्ट / ॲग्रिकल्चर / अभियांत्रिकी ग्राफिक्स / बिझनेस स्टडीज / इंटरप्रेनरशिप); उत्तीर्ण केलेली असली पाहिजे | ७५ टक्के * |
| २ | एसएससी नंतरचा २ वर्ष कालावधीचा आयटीआय मधील प्रमाणपत्र पाठ्यक्रम | २५ टक्के * |

*-

अ) अशासकीय अनुदानित स्वायत्त संस्था व अस्वायत्त संस्था (अल्पसंख्याकासाठीच्या)- अल्पसंख्याक उमेदवारांसाठी सर्वसाधारण जागांच्या ५०% जागा राखीव ठेवल्या जातील.

आ) शासकीय संस्था - (धार्मिक अल्पसंख्याकासाठी असलेल्या अभ्यासक्रमांच्या संस्था) -अल्पसंख्याक उमेदवारांसाठी सर्वसाधारण जागांच्या ७०% जागा राखीव ठेवल्या जातील.

